-: प्रकरण पहिले :-

## संशोधन विषय परिचय

# प्रकरण पहिले

## संशोधन विषय परिचय

१.१ प्रस्तावना

१.२ संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे सिंहावलोकन

१.३ संशोधन विषयाचे शब्दांकन

१.४ संशोधन विषयातील संज्ञा

१.५ संशोधन विषयाचे महत्त्व

१.६ संशोधनाची उद्दिष्टे

१.७ संशोधनाचा गृहितके

१.८ संशोधनाच्या मर्यादा

१.९ प्रकरणीकरण

१.१० समारोप

:::::::::::::::::::::::::::

## १:१ प्रस्तावना :-

अध्यापन कला की शास्त्र आहे ? या प्रश्नाचा खल आजवर अनेक तज्ञानी केलेला आहे. अर्वाचीन काळात शिक्षणाच्या कल्पना झपाट्याने बदलत आहेत. पूर्वी शिक्षण प्रक्रियेत शिक्षक केन्द्रस्थानी होते. पण अलिकडच्या काळात विद्यार्थी केन्द्रस्थानी मानला जाऊ लागला, विद्यार्थ्यांच्यासहभागाला व स्वयंशिक्षणाला महत्व प्राप्त होत गेले. अध्यापनातील साधने वाढत गेली. शिक्षणाला मानसशास्त्रीय अधिष्ठान प्राप्त होते गेले. यातूनच पुढे शिक्षणशास्त्र आणि अध्यापनशास्त्र विकसीत होत गेले. शिक्षकाना प्रशिक्षण दिले पाहिजे. असा विचार रुजत गेला व प्रशिक्षण संस्था उदयास आल्या.

आज महाराष्ट्रात सर्वत्र मराठी माध्यमातून शिक्षण दयावे, असा आग्रह धरला जातो. पण प्रत्यक्ष परिस्थिती फार वेगळी आहे. असे प्रस्तुत संशोधिकेला शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठी अध्यापन पध्दती शिकवितांना वेळोवेळी जाणवते. मराठी भाषेबद्दलचे , तिच्यातील साहित्याबद्दले व तिंच्या वापराबद्दलचे उपेक्षेचे वातावरण आढळते. मराठी बद्दलचा आदर, तिचे महत्व जाणण्यासाठी करावयाचे प्रयत्न याबाबतीत मोठ्या प्रमाणावर उदासिनिता आहे. या स्थितीतून मराठी अध्यापन पध्दतीबाबत गंभीर समस्या उदभवली आहे.

मराठी अध्यापन पध्दती बी. एड्. पदवीच्या अभ्यासक्रमात निवडावयाच्या अनेक अध्यापन पध्दती पैकी एक आहे. प्रशिक्षणार्थींना दोन अध्यापन पध्दती निवडावयाच्या असतात. त्यामध्ये पहिली अध्यापन पध्दती ही पदवी विषयाशी संबंधित असते. दुसरी अध्यापन पध्दती ऐच्छिक स्वरुपाची असून उपलब्ध अध्यापन पध्दती मधून निवडावी लागते. बी.एड्. पदवी अभ्यासक्रमाचे भारतीय समाजातील शिक्षण, शैक्षणिक मानसशास्त्र, (माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शालेय संघटन व व्यवस्थापन, शिक्षणातील विचार प्रवाह, प्रौढ -(अनौपचारिक शिक्षण किंवा शैक्षणिक तंत्रज्ञान) यासारखे

विभागानुसार अनिवार्य विषय आहेत.

मराठी ही अध्यापन पद्धती निवडणारे प्रशिक्षणार्थी "मराठी" ही सोपी व विशेष लक्ष दयावयाची गरज नसलेली बाबत समजतात असे दिसून येते. "मराठी" ही मातृभाषा असल्याने त्यात काय शिकवायचे." अशा वृत्तीने मराठीस दुय्यम स्थान देतात. मराठी काय कोणत्याही विषयाचा शिक्षक शिकवू शकतो, (अशी सर्वसाधारण धारणा आज बोकाळलेली आहे.) त्यामुळे कोणत्याही विषयाच्या शिक्षकाला कार्यभार कमी पडू लागला की, त्याला मराठी अध्यापन पद्धती शिकवायला दिली जाते.

संशोधनासाठी हा विषय निवडण्याचे आणखी एक कारण म्हणजे ही अध्यापन पद्धती शिकविणारे सहकारी अधिव्याख्यात्यांनी, यांनी या विषया संबधीच्या समस्या चर्चेद्वारा प्रस्तुत संशोधिकेजवळ अनेकवेळा मांडलेल्याआहेत.

प्रशिक्षणार्थ्यांचे अशुद्धलेखन, कच्चे अपुरे विषयज्ञान, विसंगत मुद्देमांडणी अपुरे विवेचन या व इतर बाबतीत मराठी अध्यापन पद्धतीच्या अधिव्याख्यात्यांना शंका असतात तसेच खुद्द प्रशिक्षणार्थ्यांच्याही या अध्यापन पद्धती बाबत अनेक समस्या आहेत. सबब या समस्ये बाबत संशोधन करणे महत्वाचे आहे.

१:२ संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचे सिंहावलोकन

प्रस्तुत विषयाशी संबंधित संशोधनात्मक अभ्यासाचा शोध घेण्यासाठी संशोधिकेने पुढील ग्रंथांचे अवलोकन केले :

१. दि थर्ड इंडियन इयर बुक ऑफ एज्युकेशनल रिसर्च, एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली.
२. दि सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, संपादन डॉ.एम्.बी.बुच, सेंटर ऑफ अॅडव्हान्स स्टडी इन एज्युकेशन, दि.एम्.एस्. युनिव्हर्सिटी, बरोडा.
३. एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन इन इंडियन युनिव्हर्सिटीज (१९३९ – १९६१), एन.सी.ई.आर.टी., न्यू दिल्ली.
४. एज्युकेशन इनव्हेस्टीगेशन्स इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र (१९३९ – १९७०), स्टेट इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे – ३०.

५. दि सेकंड सर्व्हे ऑफ रिसर्च इन् एज्युकेशन (१९७२ - १९७८) संपादक डॉ. एम्. बी. बुच सोसायटी फॉर एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेन्ट, बरोडा.

६. दि थर्ड सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन, (१९७८ - १९८३), नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग, मुख्य संपादक डॉ. एम. बी. बुच.

७. दि फोर्थ सर्व्हे ऑफ रिसर्च इन एज्युकेशन (१९८३ - १९८८), नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अॅन्ड ट्रेनिंग, मुख्य संपादक डॉ. एम्. बी. बुच.

८. एज्युकेशनल रिसर्च इन युनिव्हर्सिटीज इन महाराष्ट्र, प्लॅटिनम ज्युबिली इअर व्हाल्यूम, संपादक डॉ. एन् के. पाटोळे, एस्. टी. कॉलेज, बॉम्बे, १९८३.

९. भाषा व साहित्य : संशोधन (आवृत्ती १९८१), संपादक डॉ. वसंत स. जोशी, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे - ३०.

१०. महाविद्यालयीन स्तरावरील मराठीच्या अध्ययन अध्यापनाच्या समस्यांचा चिकित्सापूर्ण अभ्यास, एम्. फिल्. शोध प्रबंध, संशोधक प्रा. गोपाळकृष्ण मुरलीधर दबके, (मे, १९८६), शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

११. कोल्हापूर जिल्हयातील अध्यापक महाविद्यालयातील अध्यापन पध्दती शिकविणा-या प्राध्यापकांच्या व ही अध्यापन पध्दती निवडलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्यांचा चिकित्सात्मक अभ्यास, एम्. फिल्. शोधप्रबंध, संशोधक प्रा. शिरीष उर्फ विद्याधर दीक्षित (मे, १९८७), शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

वरील ग्रंथांचे नीट काळजीपूर्वक अवलोकन केले असता प्रस्तुत संशोधन विषयांशी संबंधित असे संशोधन अद्यापि झाले नसल्याचे आढळून येते. मात्र याविषयी लेखन, चर्चा, परिसंवाद, कृतिसत्र, बैठकी झालेले आहेत आणि अशात-हेची चर्चा विशेषत: मराठी विषयाचे प्राध्यापकच करताना आढळून आलेले आहेत. या दृष्टीनेही या विषयाचे संशोधन नाविण्यपूर्ण आहे, असे म्हणता येईल.

१:३ संशोधन विषयाचे शब्दांकन :

प्रस्तुत संशोधन विषयाचे शब्दांकन खालीलप्रमाणे केलेले आहे.

"बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सक अभ्यास"

१:४ संशोधन विषयातील संज्ञा :

संशोधन अहवाल हा एक शास्त्रीय दस्तऐवज असल्यामुळे सुस्पष्टपणे व्याख्या केलेल्या संज्ञांचा त्याच अर्थाने सातत्याने संपूर्ण शोधप्रबंधात वापर करणे अपरिहार्य आहे. संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट होण्याच्या दृष्टीनेही असे करणे इष्ट नव्हे तर आवश्यक देखील आहे. सबब संशोधन विषयाच्या वरील विधानातील महत्वाच्या संज्ञांचे कार्यात्मक स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येते.

४:१ बी. एड्. पदवी :

कोणत्याही विद्यापीठांकडून संपादित केलेल्या पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणानंतर माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षक किंवा शिक्षिका पदाच्या परिपूर्तीसाठी आवश्यक असणारे एक वर्षाचे प्रशिक्षण ज्या शिक्षणसंस्थामधून दिले जाते ते "शिक्षणशास्त्र महाविद्यालय"

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणाशी संबंधित तात्विक भागाच्या व प्रात्यक्षिक भागाच्या परीक्षेच्या अटींच्या पूर्ततेबाबत कोणत्याही विद्यापीठाकडून मिळणारी पदवी म्हणजे "बी.एड्." होय.

४:२ अभ्यासक्रम :

अभ्यासक्रम हे शिक्षणाचे एक साधन आहे. अभ्यासक्रमातून ज्ञान, अनुभव, कृती पुरविल्या जातात. सर्व महाविद्यालयीन जीवनाचा यात समावेश होतो. यामुळे प्रशिक्षणार्थ्यांच्या सर्व जीवनांगाला स्पर्श व त्यांचे समतोल व्यक्तिमत्व बनण्यास मदत होते. ज्ञानात्मक अभ्यासाची अंतर्गत एकात्मता,

त्यांची इतर अनुभवांशी आणि कृतींशी एकात्मता यांचे विशेष महत्त्व असते. कॉलेजच्या कार्यक्रम नियोजनात अभ्यासक्रम दिसतो.

"अभ्यासक्रम" हा शब्द इंग्रजीतील Curriculum या शब्दासाठी पर्यायी शब्द म्हणून वापरलेला आहे. Curriculum हा मूळ लॅटीन शब्द असून त्याचा अर्थ घोडयाच्या शर्यतीतील धावमार्ग किंवा अंतर, शर्यतीचे मैदान असा होतो. शिक्षणप्रक्रियेत उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शिक्षक - विद्यार्थ्यांनी गाठावयाचे अंतर असा त्याचा अर्थ होता येईल. हे अंतर मानसिक, बौद्धिक, भावात्मक इत्यादि विविध अंगानी विद्यार्थ्यांचा विकास त्यामध्ये अभिप्रेत आहे.

अभ्यासक्रमाची व्याख्या "मनरो" या शिक्षणतज्ञांनी पुढीलप्रमाणे केली आहे. "शैक्षणिक ध्येये साध्य करण्यासाठी शाळेत दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवांचा अभ्यासक्रमात समावेश होतो."

अभ्यासक्रमाबाबत मुदलीयार आयोगाने व्यापक भूमिका सविस्तरपणे मांडलेली आहे. आयोगाच्या अहवालात म्हटले आहे की, "अभ्यासक्रम म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान देणारे व रुढ पद्धतीने शिकविले जाणारे विषय नव्हेत, तर शाळेत मिळणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवांचा त्यात अंतर्भाव होतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या सर्व जीवनाला स्पर्श करणारे व त्यांच्या व्यक्तित्वाचा समतोल स्वरूपात विकास करणारे संपूर्ण शालेय जीवन म्हणजे अभ्यासक्रम होय."

## ४:३ मराठी अध्यापन पद्धती :

(प्रस्तुत संशोधनाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यामध्ये त्रिभाषा सूत्रांतर्गत येणारी प्रथम भाषा म्हणजे "मराठी" होय.)

शिक्षणशास्त्राचा विकास झपाट्याने होत आहे. प्रयोग, संशोधन यामुळे अध्ययन अध्यापनाच्या विविध पद्धती शोधून काढल्या जात आहेत. ज्यांना शिकवायचे त्यांचे बालमानसशास्त्र अधिकाधिक विकास पावत आहे. अध्यापनात विद्यार्थ्यांचा सहभाग अधिकाधिक वाढवा यासाठी नवनव्या

सुधारणा सुचवल्या जात आहेत. शिक्षकाने शिकविण्यापूर्वी पाठाची तयारी कशी करावी. पाठाची रुपरेषा अद्ययाबत तंत्र - पध्दती प्रमाणे कशी करावी; वर्गात शिकवत असतांना अध्ययन अनुभव कसे द्यावे, शिस्त कशी राखावी, प्रश्न कोणते व कसे विचारावेत, विद्यार्थ्यांची उत्तरे कशी स्वीकारावीत, योग्यरितीने संभावना कशी करावी, स्पष्टीकरण कसे करावे, अध्यापन साहित्याचा वापर कोठे व कसा करावा, फलकलेखनात कोणती शिस्त पाळावी, अध्यापन परिणामकारक करण्यासाठी सूक्ष्म अध्यापन कौशल्यांचा वापर कसा करावा, अभ्यासपूरक कार्यक्रमांचे संघटन व नियोजन कसे करावे, शिक्षणाच्या उद्दिष्टांप्रत पोहोचण्यासाठी शिक्षकाने कोणत्या गोष्टींचा विचार अधिक केला पाहिजे, या बाबी शिक्षणशास्त्रात नवनव्या प्रकारे सामील होत आहेत. त्यामुळे अध्यापनशास्त्र हे आजच्या काळात गतिमानशास्त्र बनलेले आहे. याची कल्पना नव्याने होऊ पाहाणाऱ्या शिक्षकाला असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे मराठी विषयाचा शिक्षक होणाऱ्या प्रत्येकाला मराठी विषयाचे प्रशिक्षण दिले जाते.

४:४ पाठ्यक्रम :

अभ्यासक्रमावरुन पाठ्यक्रम तयार केला जात असतो. अभ्यासक्रमातील अपेक्षानुसार पाठ्यक्रम तयार करावा लागतो. ठरलेला पाठ्यक्रम शिक्षकाला निश्चित कालावधीत पूर्ण करावा लागतो. पाठ्यक्रमानुसार त्याला संपूर्ण वर्षाचे नियोजन करुन अभ्यासविषय कार्यक्रम नियोजित करावे लागतात. त्यामुळे दैनंदिन अध्यापनाच्या दृष्टीने पाठ्यक्रम हा शिक्षकाला मार्गदर्शन करत असतो.

विशिष्ठ कालमर्यादित विद्यार्थ्यांना विशिष्ठ अभ्यासक्रमाद्वारे, विशिष्ठ उद्दिष्टांप्रत पोहचण्यासाठी निश्चित असा ठरवलेला, मार्गदर्शक ठरेल असा आशय पाठ्यक्रमात संघटीत केला जातो. पाठ्यक्रम हा प्रत्येक इयत्तेनुसार स्वतंत्र असा निर्माण केलेला असतो.

"पाठ्यक्रम म्हणजे एखादया विषयाचा एखादया वर्षासाठी नेमून दिलेला अभ्यास" जसे इयत्ता ९ वीसाठी शिकवला जाणारा मराठी विषयाचा अभ्यासक्रमानुसारचा भाग म्हणजे मराठीचा पाठ्यक्रम.

पाठ्यक्रम हा शिक्षकाला साधन ठरत असतो तर विद्यार्थ्यांना अपेक्षित अभ्यासक्रमाच्या अपेक्षित उद्दिष्टांपर्यन्त नेऊन सोडत असतो. पाठ्यक्रमात विषयाची अधिक स्पष्ट निश्चित कल्पना येत असते. या पाठ्यक्रमावरूनच पाठ्यपुस्तक तयार केले जात असते, गद्य, पद्य, व्याकरण यांची विशिष्ट प्रकारे रचना करण्यास पाठ्यक्रम मदत करत असतो. पाठ्यक्रमामुळे राबवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमात संतुलन राखणे सुलभ होते. मराठी विषयात श्रवण, वाचन, भाषण, लेखन याबाबत संतुलीत व मानसशास्त्रीय रचना करणे सुलभ होते. विद्यार्थ्यांना अध्ययनाची दिशा प्राप्त होते.

पाठ्यक्रम तयार करत असतांना लक्षात घ्यावयाच्या बाबी पुढीलप्रमाणे सांगता येतात.

१) पाठ्यक्रमात विद्यार्थ्यांच्या भाषिक आवश्यकतेचे परिपूर्ण प्रतिबिंब उमटत असते.

२) पाठ्यक्रम विद्यार्थ्यांच्या मानसिक गरजेनुसार तयार केला जात असतो.

३) पाठ्यक्रम योग्य वेळेत पूर्ण होईल याचे भान पाळले जाते.

४) पाठ्यक्रम हा जीवनाशी संबंधित व व्यावहारिक गरजांना जाणून घेऊन पूर्ण केला जातो.

५) अभ्यासक्रमाला अनुसरून पाठ्यक्रम तयार केला जात असतो.

पाठ्यक्रमाची रचना समजावून घेवून अध्यापन करणे हे शिक्षकांला अधिक फलदायी ठरत असते. पण आपल्याकडे स्वतंत्र पाठ्यक्रम अद्याप तयार केला जात नाही पाठ्यक्रम व अभ्यासक्रम एकत्र छापले जातात.

४:५ <u>चिकित्सक अभ्यास :</u>

चिकित्सक अभ्यास म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग, तपशीलवार,

समीक्षणात्मक, असा अभ्यास की ज्यामध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची आणि तिच्या अभ्यासाची कारणमिमांसा शोधून विषयाची परिणामकारकता वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविता येईल.

१:५ संशोधन विषयाचे महत्त्व :

आजचा शिक्षक हा पूर्वीसारखा एकमार्गी असून चालणार नाही तर त्याला बहुमार्गी बनणे गरजेचे आहे. मराठीचा शिक्षक म्हणून ज्या क्षमता अपेक्षित आहेत त्याकडे विशेष लक्ष न दिल्याने त्याचा परिणाम मराठी अध्यापनावर व विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होत आहे. प्रस्तुत संशोधनाने शिक्षणशास्त्र महाविद्यालयीन स्तरावर दैनंदिन अध्ययन-अध्यापन कार्यात सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने निश्चित मदत होईल.

मराठी अध्यापन पद्धती ही मराठी भाषिक समाजातील मानवी ऐक्य निर्माण करणारे एक प्रमुख साधन आहे. म्हणून मराठी भाषिका-भाषिकामधील विचारांची देवघेव वाढविण्या मधून या संशोधन विषयाचे महत्त्व अधिक जाणवत आहे.

शालेय शिक्षणात मराठी मातृभाषेच्या अभ्यासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सर्व शिक्षणाचे माध्यम मातृभाषा असल्यामुळे तिच्या अभ्यासक्रमाबाबत अधिक चिकित्सक दृष्टीठेवणे गरजेचे असते. बहुतेक सर्व विषय मातृभाषेतून शिकवत असल्यामुळे मातृभाषेच्या अभ्यासाची उद्दिष्टे त्यातून साध्य होतीलच त्यामुळे प्रत्येक विषयाचा अभ्यास हा एका अर्थाने मातृभाषेचा अभ्यासच असतो, मातृभाषा हा स्वतंत्र विषय नसून तो सर्व शिक्षणाचा पाया आहे. पण या सर्व विषयांचे अध्यापन मातृभाषेतून होत असताना मुख्य दृष्टी भाषा अभ्यासावर स्थिर नसते. म्हणून या संशोधन विषयाचे महत्त्व वाढते.

सद्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठीचे अध्यापन ज्या पद्धतीने होत आहे त्या संदर्भात ज्या अडचणी वारंवार भेडसावत आहेत त्यांचा सूक्ष्म अभ्यास करून त्यातून ते उपयोगी पडेल याद्वारे मराठीचे जाणकार व चांगले शिक्षक होण्याच्या दृष्टीने वाटचाल करता येईल.

बी. एड्. पदवीचा अभ्यासक्रम हा एक वर्षाचा आहे व मराठीचा जर आपण अभ्यासक्रम पाहिला तर तो फारच विस्तीर्ण आहे. कमीत कमी वेळात जास्तीत जास्त शिकणे असे स्वरुप आहे. या परिस्थितीत मूलभूत भाषिक कौशल्ये, उद्दिष्टे याकडे सूक्ष्म व विशेष लक्ष या पध्दतीच्या पाठ्यक्रमांनी देणे दुर्मिळ होत असल्याने प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा वाटत आहे.

मातृभाषेतील प्राविण्य हा सर्वच विषयातील अध्ययनाचा पाया आहे. विद्यार्थ्यांमध्ये हे प्राविण्य यावयास हवे असेल तर ते मुळात शिक्षकात यावयास हवे कारण समाज त्या समाजातील शिक्षकांच्या क्षमतेपेक्षा अधिक वरची पायरी गाठू शकत नाही. तो जर शिक्षकात यावयास हवा असेल तर त्याचे प्रशिक्षण व प्रशिक्षणाचा पाठ्यक्रम अधिक कसदार असणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन विषयातील मराठीचा तसा आहे काय ? हे पहाण्याच्या दृष्टीने या अभ्यासविषयाचे महत्व अनन्य साधारण वाटते.

मराठी भाषा प्रभावीपणे कशी शिकावी आणि शिकवावी याचे सम्यक उत्तर मिळवायाचे असेल तर मराठी माध्यमाचा पुरस्कार करणाऱ्या सर्वांनाच हा संशोधन विषय महत्वाचा ठरणार आहे.

## १.६ संशोधनाची उद्दिष्टे :-

प्रस्तुत संशोधनाची पुढील सहा प्रमुख उद्दिष्टे आहेत.

१. बी. एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दती या विषयाची उद्दिष्टे कितपत सफल होतात हे पाहाणे.

२. बी. एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाचे गुणावगुण पाहणे.

३. मराठी अध्यापन पध्दती या विषयाच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्याचे गुणावगुण पाहणे.

४. मराठी अध्यापन पध्दती या विषयाचा पाठ्यक्रम अधिकाधिक समृध्द व संपन्न करणे.

५. मराठी अध्यापन पद्धती या विषयाच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्य अधिक समृद्ध व संपन्न बनविणे.

६. शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्धती निवडलेल्या प्रशिक्षणार्थींचे प्रशिक्षण अधिक कसदार होण्यासाठी शिफारशी करणे

---

## १. ७. संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनाची पुढील दोन गृहितके आहेत.

१. मराठी अध्यापन पद्धतीचे चांगले, प्रभावी परिणाम कारक अध्ययन - अध्यापन होणेसाठी मराठीच्या पाठ्यक्रमाचा अभ्यास कसदार असणे आवश्यक आहे.

२. मराठी अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षणार्थी माध्यमिक शाळांत नोकरीसाठी जातात तेव्हा त्यांना हा अभ्यास "मराठी अध्यापन पद्धती" चा सह-शिक्षक म्हणून प्रभुत्व मिळविण्यास मदत करतो.

---

## १.८ संशोधनाच्या मर्यादा

प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादा पुढील प्रमाणे आहेत.

१. प्रस्तुत संशोधन कोल्हापूर जिल्ह्यातील"शिवाजी विद्यापीठाशी" संलग्न असलेल्या एकवर्षीय शिक्षणशास्त्र महाविद्यालयापुरते मर्यादित आहे.

२. हे संशोधन बी. एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमापुरतेच मर्यादित आहे.

३. त्यामुळेच बी. एड्. पदवीला मराठी अध्यापन पद्धती घेतलेल्या प्रशिक्षणार्थीं पुरतेच मर्यादित आहे.

४. हे संशोधन कोल्हापूर जिल्ह्यातील पुढील १४ शिक्षणशास्त्र महाविद्यालया-पुरते मर्यादित आहे.

१] श्रीमती महाराणी ताराबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, कोल्हापूर.
२] आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गारगोटी.
३] बाळासाहेब गणपतराव खराडे कॉलेज ऑफ एज्युकेशन, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
४] वसंतराव नाईक कॉलेज ऑफ एज्युकेशन, दसरा चौक, कोल्हापूर.
५] कॉलेज ऑफ एज्युकेशन, पेठ वडगाव, ता. हातकणंगले, कोल्हापूर.
६] कॉलेज ऑफ एज्युकेशन, राजवाडा, इचलकरंजी, कोल्हापूर.
७] सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.
८] छत्रपती शिवाजी कॉलेज ऑफ एज्युकेशन, रुकडी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.
९] शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कागल, कोल्हापूर.
१०] जागृती बी. एड्. कॉलेज, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.
११] यशवंतराव शिक्षणशास्त्र महाविद्यालय, कोडोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.
१२] कल्पवृक्ष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मेनरोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर.
१३] डी. के. शिंदे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

१.९ - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## १:९ संशोधन पद्धती :

हे संशोधन वर्तमान परिस्थितीशी निगडीत असल्याने यामध्ये सर्वेक्षणात्मक पद्धती वापरली आहे. प्रस्तुत संशोधनामुळे मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाची सद्य:स्थिती कोणती आहे, हे जाणून घेण्यास ही संशोधन पद्धती सामग्रीचे संकलन, वर्णन स्पष्टीकरण, मुल्यांकन केले असून संख्याशास्त्रीय साधनांचा वापराकरिता सारणी, सरासरी आणि टक्केवारीचा उपयोग केला आहे. तसेच [illegible] बदलांसाठी उपयुक्त शिफारशी करण्यात आल्या आहेत.

प्रस्तुत संशोधप्रबंधाचे दोन भाग पडतात.

१] मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व उपयुक्तता अजमाविण्यासाठी मराठीअध्यापन पद्धती शिकवित असलेल्या अधिव्याख्यात्यांना व बी.एड्. पदवी संपादन करुन नोकरीत असलेल्या शिक्षकांना प्रश्नावली देऊन त्या भरुन घेऊन त्या माहितीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ लावलेला आहे.

२] दुस-या विभागात अनेक वर्षे मराठी अध्यापन पद्धती शिकविलेल्या आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरीत असणा-या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेऊन मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करुन अन्वयार्थ

लावलेला आहे.

१ : अ] नमुना निवड -

कोल्हापूर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या अनुदानित व विनाअनुदानित १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची निवड यात केली आहे. या १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांपैकी ०२ शिक्षणशास्त्र महाविद्यालये ही अनुदानित आहेत व ११ शिक्षणशास्त्र महाविद्यालये ही विनाअनुदानित आहेत. या सर्व महाविद्यालयांतून मराठी पाठ्यक्रमाच्या उपयुक्ततेविषयी माहिती मिळविली तसेच मराठी शिक्षकांचे विचार, मते मिळविली तेंव्हा अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीपुरती सर्व जनसंख्या विचारात घेतली आहे.

प्रश्नावलीद्वारे मिळालेली माहिती पडताळून पाहण्यासाठी, तिची यथार्थता विश्वसनीयता प्रस्थापित करण्यासाठी मराठी पाठ्यक्रम शिकविणाऱ्या १५ अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेतल्या.

शिवाजी विद्यापीठांशी संलग्न असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १९९३-९४ शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या मराठी पाठ्यक्रमाच्या शिक्षकांची संख्या १४० इतकी आहे. अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली व मुलाखती घेण्यासाठी प्रत्यक्षात शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना भेटी दिल्या. (नोकरीत असलेल्या शिक्षकांच्या कडून प्रश्नावली भरुन घेण्यासाठी योग्य त्यावेळी काही वेळा माध्यमिक शाळेत तर काहीवेळा त्यांच्या घरी संपर्क साधावा लागला.)

मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम संपन्न, समृद्ध, सक्षम तसेच अध्यापनात सामर्थ्य येण्यास मराठी अध्यापन पद्धतीच्या शिक्षणतज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले.

१ : ब] संशोधनाची साधने -

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने पुढील साधनांचा

वापर केला आहे.

१] प्रश्नावली :

ही प्रश्नावली कोल्हापूर जिल्ह्यांतर्गत मराठीच्या अधिव्याख्यात्यांना आहे. या प्रश्नावली देण्यापाठीमागचा उद्देश मराठी पाठ्यक्रमांची सक्षमता वाढविणे हा आहे. तसेच जे प्रशिक्षणार्थी मराठीचे अध्ययन करतात आणि ज्यांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे अशाही प्रशिक्षणार्थ्यांची विचारसरणी येथे समजावून घेण्याचा एक प्रयत्न केला आहे.

२] मुलाखती :

प्रश्नावलीद्वारे मिळालेली माहिती पडताळून पहाणे, तिची यथार्थता आणि विश्वसनीयता प्रस्थापित करणे या उद्देशाने मुलाखती घेतल्या आहेत. यामध्ये १५ अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

३] विशेष मार्गदर्शन :

मराठी पाठ्यक्रमासंबंधी उपयुक्त मार्गदर्शन मिळविणे आणि संशोधनासंबंधी उपयुक्त शिफारशी करणे या उद्देशाने मराठी शिक्षणतज्ञांची प्रत्यक्ष भेट घेतली आहे.

१·१० **प्रकरणीकरण :**

**प्रकरण – १ : संशोधन विषय परिचय**

यामध्ये प्रस्तुत संशोधिकेने संशोधनासाठी हाच विषय का निवडला याचा ऊहापोह करून संशोधन विषयाचे शब्दांकन, संज्ञांचे कार्यात्मक स्प स्पष्टीकरण केलेले आहे. संशोधन विषयाचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके व मर्यादा यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

**प्रकरण – २ : बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम**

प्रस्तुत प्रकरणात मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा सैध्दान्तिक भाग, उद्दिष्टे, आणि त्यांची स्पष्टीकरणे, सैध्दान्तिक भागाची कार्यवाही, प्रात्यक्षिक भागाची उद्दिष्टे, उद्दिष्टांची स्पष्टीकरणे, प्रात्यक्षिक भागाची कार्यवाही याचे स्पष्टीकरण केलेले आहे.

**प्रकरण – ३ : संशोधनाची कार्यपध्दती**

यामध्येसंशोधन सामग्रीचे स्वरूप, सामग्री गोळा करण्यासाठी वापरलेली साधने, जनसंख्या व नमुना निवड, सामग्रीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन स्पष्ट केले आहे.

**प्रकरण – ४ : संशोधनासाठी संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण व अन्वयार्थ**

या प्रकरणात "अ" आणि "ब" असे दोन विभाग केलेले आहेत "अ" विभागात मराठी अध्यापन पध्दतीचया पाठ्यक्रमाचे सामर्थ्य व

उपयुक्तते विषयी माहितीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

"ब" विभागात अनेक वर्षे मराठी अध्यापन पद्धती शिकविलेल्या आणि शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नोकरीत असणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या मुलाखती घेऊन मिळविलेल्या माहितीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

## प्रकरण - ५ : निष्कर्ष व शिफारशी

यामध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाच्या वस्तुस्थितीचे निरीक्षण व परीक्षण करून तसेच शिक्षणतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संशोधनपर प्रस्तुत विषयाचे निष्कर्ष काढले आहेत.

# -:प्रकरण दोन :-

## "बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम"

२:१ प्रास्ताविक

२:२ मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम

२:३ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा सैद्धान्तिक भाग

२:४ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाच्या सैद्धान्तिक भागाची उद्दिष्टे.

.:५ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाच्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे.

:६ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाची कार्यवाही

७ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा प्रात्यक्षिक भाग

८ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची उद्दिष्टे

९ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाच्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे :-

१० मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची कार्यवाही.

११ समारोप :-

## २:१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनाचा "बी. एड् पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सात्मक अभ्यास" हा विषय आहे. पहिल्या प्रकरणामध्ये संशोधिकेने संशोधनासाठी हाच विषय का निवडला, या विषयाचा शिक्षणप्रक्रियेशी असलेला संबंध याची माहिती दिली आहे. तसेच यामध्ये संशोधन विषयाचे शब्दांकन, संज्ञांच्या कार्यात्मक व्याख्या, त्यांचे महत्त्व, उद्दिष्टे, गृहितके, मर्यादा स्पष्ट केल्या आहेत.

दुसऱ्या प्रकरणात मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम कोणता आहे; या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भाग कोणता आहे, सैद्धान्तिक भागाची उद्दिष्टे कोणती आहेत, संबंधित उद्दिष्टांची स्पष्टीकरणे कशी केली जातात, संबंधित सैद्धान्तिक भागाची कार्यवाही कशा प्रकारे केली जाते, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा प्रात्यक्षिक भागाची कार्यवाही कशी करवून घेतली जाते, ते जाणणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणामध्ये याच मुद्द्यांचा परामर्श घेतला गेला आहे.

शिक्षणशास्त्राचा विकास झपाट्याने होत आहे. प्रयोग, संशोधन, उपक्रम यामुळे अध्ययन - अध्यापनाच्या विविध पद्धती शोधून काढल्या जात आहेत. ज्याना शिकवायचे त्यांचे मानसशास्त्र अधिकाधिक विकास पावत आहे. अध्यापनात प्रशिक्षणार्थींचा सहभाग अधिक वाढावा यासाठी नवनव्या सुधारणा सुचवल्या जात आहेत. अध्यापन शास्त्र हे आजच्या काळात गतिमानशास्त्र बनलेले आहे. याची कल्पना नव्याने होऊ पहाणाऱ्या मराठी शिक्षकाला असणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे त्याला मराठी अध्यापन पद्धतीचा अभ्यास करणे हितावह आहे.

आजचा शिक्षक हा पूर्वीसारखा एकमार्गी असून चालणार नाही. तर त्याला बहुमार्गी बनविणे गरजेचे आहे. त्यामुळे आजच्या शिक्षणशास्त्राचा व अध्यापन पद्धतीचा आवाका फार मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. शिक्षकाच्या अंगी शिकविण्याची कला उपजत असेल तरीही त्याला प्रशिक्षण देण्याची गरज निर्माण झालेली आहे. प्रशिक्षणातून तयार झालेला शिक्षक विद्यार्थ्यांचे हित अधिक सांभाळेल अशी भावना बाळगुन प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबवले जाऊ लागले

<u>शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षण अभ्यासक्रमाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे सांगता येतील.</u>

(१) शिक्षक प्रशालेत जो विषय शिकविणार असेल त्या विषयात तो पारंगत असावयास पाहिजे. शाळेतील बहुतेक सर्व वर्गांना तो विषय शिकविता आला पाहिजे.

(२) माध्यमिक प्रशालेतील विद्यार्थी कौमार्यपूर्वकाल व कौमार्यावस्था या शारीरिक ज्ञान अवस्थात असतात तेंव्हा त्या अवस्थाचे मानसशास्त्रीय ज्ञान शिक्षकाना असले पाहिजे. बालपणातील अवस्थेपेक्षा कौमार्यावस्थेत मुला - मुलींची शारिरिक वाढ, त्याच्या आवडी - निवडी व अभिवृत्ती निराळया असतात, त्याचे ज्ञान शिक्षकाने करुन घेतले पाहिजे.

(३) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक व शैक्षणिक प्रश्नांकडे शिक्षकांचे लक्ष पाहिजे, व वेळोवेळी त्याने त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे व सल्लाही दिला पाहिजे. मुलांच्या सर्जनशीलतेला उत्तेजन देऊन त्यांना व्यवसायाभिमुख करता आले पाहिजे त्यासाठी त्यांना मार्गदर्शनही करता आले पाहिजे.

या उद्दिष्टाप्रत पोहोचणारा अभ्यासक्रम प्रशिक्षण कालावधीसाठी तयार केलेला दिसतो. त्या शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे खालील प्रमाणे सांगितली जातात.

शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमाची उद्दिष्टे :-

(१) विद्यार्थी शिक्षकास स्वत:चे व विद्यार्थ्यांचे यथायोग्य ज्ञान मिळविण्याचे सामर्थ्य प्राप्त करुन देणे.

(२) शिक्षकामध्ये सामाजिक मूल्यांचा व ध्येयाचा जाणीव दृढ करणे.

(३) विद्यार्थ्यांच्या उपयोगी पडता यावे म्हणून व्यावसायिक कर्तव्या बाबतची जाणीव निर्माण करणे.

(४) शिक्षक व्यवसायात अपेक्षित असलेली गतिमानता जाणण्याची व तिचा यथार्थ कल्पना येण्याची पात्रता आणून देणे.

(५) या गतिमानातून जाताना व ती हस्तगत करुन घेत असताना आपण कार्यक्षम शिक्षक बनावे ही प्रेरणा त्यांच्यात निर्माण करणे.

( महाराष्ट्र राज्य, शिक्षक प्रशिक्षण समितीचे इतिवृत्त १९६५-६६ अशा उद्दिष्टांनी युक्त प्रशिक्षण कार्यक्रमातून योग्य शिक्षक निर्माण व्हावा. अशा अपेक्षा बाळगण्यात आलेली दिसते. )

अशा प्रशिक्षण कार्यक्रमातून तयार केलेल्या शिक्षकास राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विकासाची उद्दिष्टे कोणती आहेत याची माहिती असली पाहिजे तरच त्याला येणाऱ्या पिढीला उत्कृष्ट नागरिक बनविता येईल. अशी धारणा बाळगून प्रशिक्षणाचे कार्यक्रम राबविले जातात. या प्रशिक्षण कार्यक्रमात सातत्याने गरजेनुसार बदल केले जातात. नवे शोध, नवे तंत्र यांचा समावेश या प्रशिक्षण कार्यक्रमात करण्याचा प्रयत्न तज्ज्ञ करत असतात. प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम राबविण्यासाठी एक वर्षाचा कालावधी असतो. त्यामध्ये प्रात्यक्षिक कार्य व सैध्दान्तिक भाग / विषय अशी विभागणी केलेली असते. प्रात्यक्षिक कार्यातून सैध्दान्तिक भागाचा माहिती देण्याचा प्रयत्न अल्पशा प्रमाणात करण्यात येतो आणि वर्षभराचा अभ्यासक्रम पूर्ण केला जातो.

नव्या शैक्षणिक धोरणानुसार प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची पुर्नरचना करण्यात आली आहे. त्यामुळे शिक्षक-शिक्षण अभ्यासक्रमातील महत्वाचे परिवर्तन घडत आहे. नवे शैक्षणिक धोरण यशस्वी करावयाचे असेल तर आपल्याला अध्यापन तंत्रातही होत चाललेलेबदल स्विकारत जाणे अपरिहार्य आहे.

मराठी विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वर्तमान स्थितीत बदलत आहे. अन्य विषयाचे शिक्षक सुध्दा मराठी भाषा शिकवितांना दिसतात. किंवा कोणत्याही विषयाच्या शिक्षकाला कार्यभार कमी पडू लागला की त्यांना मराठीचे तास दिले जातात. अशा प्रकारचे वातावरण माध्यमिक प्रशालेत दिसत आहे. तसेच शारिरिक शिक्षणाच्या शिक्षकांनाही मराठीचे अध्यापन करावयास लावले जाते. परिणामी पदवीधर विद्यार्थ्यांनाही मराठी नीटसे बोलता, वाचता व लिहिता येत नाही. अशी परिस्थिती थोड्या फार फरकाने सर्वत्र वावरत आहे. वर्गात विद्यार्थ्यांना बहुस्पर्शी ज्ञान देण्याऐवजी त्यांना परीक्षेचा कार्यक्रम डोळ्यासमोर ठेवून अध्यापन केले जाते. परीक्षेत संभाव्य प्रश्न गृहीत धरून त्याचभोवती शिक्षकाचे अध्यापन रेंगाळत जाते. परिणामी अभ्यासक्रमाची मूळ उद्दिष्टे बाजूस पडतात आणि परीक्षा हे एकमेव उद्दिष्ट समोर ठेवले जाते. ही परिस्थिती मराठी विषयाबाबत आढळते. त्यामुळे मराठी अध्यापनाला मर्यादा पडतात व त्याबरोबर विद्यार्थ्यांच्या विकासाला खीळ बसते आहे हे सिध्द करावे लागेल.

तसेच अध्यापनातील अपप्रवृत्ती वाढत आहेत. अध्यापनातील शिक्षणक्रम ठराविक साच्याने वाढत आहेत. अध्यापनातील शिक्षणक्रम तसेच घटकाचा सारांश, लिहून देण्यात अधिकाधिक वेळ घालविला गेल्यामुळे दुहेरी फायदे होतात एक म्हणजे एक वही अनेक वर्षे अध्यापकाना वापरता येते आणि अर्ध्याहून अधिक दिवस अध्यापनाचे दिवस / लिखान लिहून देण्यात घालविल्यामुळे अध्यापनाची पूर्वतयारी करावी लागत नाही. दुसरे म्हणजे विद्यार्थ्यांना परीक्षेत येणाऱ्या प्रश्नांच्या अनुरोधाने लिहून दिल्याने विद्यार्थी वर्ग आनंदी होऊन त्यांना विद्यार्थी प्रियता मिळवता येते. परिणामी विद्यार्थ्यांचा विकास होण्याऐवजी ते ज्ञानाच्या पातळीवरच खुटके होतात.

मराठी विषयाच्या बाबतीत ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. उपरोक्त वर्तमान स्थितीत परिवर्तन करावयाचे असेल तर मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे अभ्यासणे अत्यावश्यक आहे.

o o o o o o o o o

## २:१ मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्क्रम

मराठीच्या अध्यापनपद्दतीचा स्वतंत्र आणि विशिष्ट पाठ्यक्रम आहे. ही प्रश्नपत्रिका क्रमांक पाच मध्ये येते. या अभ्यासक्रमांतर्गत एकूण ९ घटक येतात. सर्व प्रथम अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान, मराठी अध्यापनाचे हेतू आणि उद्दिष्टे मराठी अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तके, मराठी अध्यापनाच्या विविध प्रयुक्त्या व तंत्रे, अध्ययन अनुभव आणि अध्यापन साहित्य, अध्यापनाचे नियोजन व संघटन मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन आणि मूल्यमापन पद्दती अशा क्रमशः इतर घटकांचा समाविश केलेला आहे. मातृभाषा हा सर्व शिक्षणाचा पाया म्हणून मातृभाषेच्या अध्यापनाच्या अभ्यासक्रमास मूलभूत महत्व असते. त्याचा खास अभ्यासक्रम आखावा लागतो. तो व्यक्ती आणि समाज यांच्याशी सुसंगत आणि भाषिक कौशल्ये वाढीस लावणारा असा असावा लागतो.

मराठी अध्यापन पद्दती घेतलेल्या शिक्षकाना मराठी अध्यापना बाबत असलेले प्रात्यक्षिक कार्यही पूर्ण करावे लागते. या मध्ये सूक्ष्म अध्यापनातुन ५ सूक्ष्मपाठ आणि एक एकात्मिककरणाचा पाठ द्यावा लागतो. आशययुक्त अध्यापन पद्दतीच्या कृतिसत्राचे कार्य पूर्ण करुन चाचणी दयावी लागते. पाठ्क्षिक शाळेच्या ठिकाणी सलग सराव पाठ द्यावे लागतात आणि असे एकूण १० अध्यापनाचे पाठ पूर्ण करुन वार्षिक पाठाची तयारीही करावी लागते शेवटी मूल्यमापन कृतिसत्रात घटक नियोजन, वार्षिक नियोजनाचा आराखडा तयार करावा लागतो. हा सर्व अभ्यासक्रम मराठी अध्यापन पद्दतीच्या प्रात्यक्षिक कार्यामध्ये येतो. प्रस्तुत शोधप्रबंधात मराठी अध्यापन पद्दतीचा चिकित्सात्मक अभ्यास करावयाचा असल्यामुळे या दोन्ही विभागाचा अभ्यासक्रम परिशिष्ठ "क" आणि "ज" मध्ये दिलेले आहेत.

## २ :१ मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमाचा सैद्दान्तिक भाग :-

मराठी अध्यापन पद्दती ही सर्व अध्यापन पद्धतीचा मूलभूत पाया आहे. या अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमा मध्ये सैद्दान्तिक भागात पुढील घटक आणि त्याअंतर्गत असणा-या उपघटकांचा समावेश होतो.

घटक १ :- अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान

(अ) स्थान व महत्व

(१) अध्ययन - अध्यापनात मराठीचे ( मातृभाषेचे ) माध्यम म्हणून स्थान प्राथमिक, माध्यमिक शाळेतील महत्व.

(२) सामाजिक व सांस्कृतिक वारशांच्या प्रसारणाचे साधन

(३) वाड्:मयीन आवड व अभिरुची निर्माण करण्याचे साधन

(४) तोंडी व लेखी आत्मनिवेदनाचे साधन

(५) विचार, भावना व अनुभव यांच्या आदान प्रदानाचे साधन

(६) बौद्दिक, भावनिक व कार्यात्मक व्यक्ती विकास करण्याचे / साधण्याचे साधन

(७) ज्ञान व मनोरंजन प्राप्तीचे साधन

(ब) सहसंबंध

विषयाचा इतर विषयांशी तसेच अंतर्गत सहसंबंध

घटक - २ :-

मराठी अध्यापनाचे हेतु व उद्दिष्टे :-

(अ) प्रथम भाषा म्हणून मराठीच्या अध्यापनाचे हेतु व उद्दिष्टे : आकलन रसग्रहण , शब्दसंपत्तीचा विकास, मौखिक व लेखनाद्वारे अभिव्यक्ती, साहित्याचा परिचय

(ब) मराठी अध्यापनाची वर्ग उद्दिष्टे व त्यांची स्पष्टीकरणे.

(क) महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांतील नियुक्त अभ्यासक्रमाची उद्दिष्टे.

घटक - ३ :- मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके

(अ) चांगल्या अभ्यासक्रमाची लक्षणे व प्रकार

(ब) ५ वी, ते १० वी. च्या नियुक्त अभ्यासक्रमाचे चिकित्सक परीक्षण गद्य, पद्य व व्याकरण विषयक तपशील, पुरवणी वाचन, अभ्यासक्रमपूरक कार्यक्रम,

(क) मराठीच्या चांगल्या पाठ्यपुस्तकाची लक्षणे :-
प्रयोजन, बहिरंग, अंतरंग, वेष्टन, चित्रे, कागद,
आकार, लेख्यांचे स्वरूप, संपादन, परिचय, टीपा टीप्पणी, शब्दार्थ, धड्यावरील प्रश्न, इ.

मराठी राज्यातील इ. ५ वी. ते १० वी.च्या मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकांचा चिकित्सक अभ्यास,

आशय विश्लेषण, अर्थ व प्रक्रिया, शिक्षक अध्यापन, पुस्तिका, स्वाध्याय पुस्तिका.

घटक ४ :- मराठी अध्यापनाच्या विविध पध्दती, प्रयुक्त्या व तंत्रे.

अ) अध्यापनाची सूत्रे

ब) अध्यापन पध्दती, उद्गामी - अवगामी, वारसंवाद, कथन व्याख्यान,

क) अध्यापनाच्या प्रयुक्त्या : स्पष्टीकरण, प्रश्न, दाखले, नाट्यीकरण.

ड) अध्यापनाची तंत्रे :- चर्चा, स्वाध्याय, पर्यवेक्षित अध्ययन,

घटक - ५ :- अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य :-

(अ) अध्ययन अनुभव, श्रवण, प्रगटवाचन, मूकवाचन, भाषण, नाट्यीकरण, पाठांतरे, लेखन, रसग्रहण, कोषांचा व संदर्भ ग्रंथाचा वापर, पुरकवाचन व लेखन, अध्यापन साहित्य उपक्रमांचा उपयोग

(ब) अध्यापन साहित्य :- दृकश्राव्य साधने, चित्रे, तक्ते, विविध प्रकारचे फलक, फ्लॅशकार्डस, स्लाईडस्, फिल्मस्ट्रिप्स, टेपरेकार्डर, लिंग्वाफोन, रेडिओ, टी. व्ही. इ.

(क) अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक उपक्रम : वादविवाद, कथाकथन, वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, हस्तलिखित, स्पर्धा, भावगीत स्पर्धा, भाषाखेळ, भेंड्या, भित्तीपत्रिका मराठी मंडळ इत्यादी. . .

घटक - ६ .- अध्यापनाचे नियोजन व संघटन :-

(अ) वार्षिक नियोजन

(ब) घटक नियोजन

(क) दैनंदिन पाठनियोजन :- उद्दिष्टे स्पष्टीकरणे, पाठ्यवस्तु, शैक्षणिक अनुभव, अध्यापन, साधने, मूल्यमापन व स्वाध्याय.

(ड) पाठांचे प्रकार, माहिती निष्ठ, रसग्रहणात्मक, सारग्रहणात्मक, निबंधलेखन, कृतिकेन्द्रित इ.

घटक - ७ :- मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन :-

(अ) गद्य व पद्य यांचे अध्यापन

(ब) व्याकरण अध्यापन

(क) लेखन विकास

(ड) वाचन विकास

(इ) भाषण, पाठांतर, पुस्तकलेखन, शुध्दलेखन

घटक - ८ :- मूल्यमापन पध्दती :-

(अ) भाषाविषयक, मूल्यमापनाचे स्वरुप, प्रश्न प्रकार, परीक्षांचे नियोजन

(ब) घटक चाचणी, : रचना व प्रशासन

(क) भाषिक कौशल्ये दोष, चिकित्सा, निदानात्मक व उपचारात्मक कार्य -

घटक - ९ :- भाषा शिक्षक

(अ) भाषा शिक्षकाची अर्हता, दृष्टिकोन, व गुणविशेषण

(ब) भाषा शिक्षकाचा व्यावसायिक विकास

(क) मराठी भाषा शिक्षक संघटना, गरज, स्वरुप व कार्यक्रम

अशा प्रकारे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमामध्ये एकूण ९ घटकांचा समावेश केला आहे.

२.४ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैदान्तिक भागाची उद्दिष्टे :-

विद्यार्थी शिक्षकास मराठी अध्यापन पद्धती मधील सैद्दान्तिक भाग अभ्यासताना पुढील उद्दिष्टे आत्मसात करता आली पाहिजेत.

१. मराठी ( मातृभाषा ) चे अभ्यासक्रमातील तसेच बालकाच्या शिक्षणातील स्थान आणि महत्व समजण्यास मदत करणे.

२. मराठी अध्यापनाचे हेतु व उद्दिष्टे याबाबतचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

३. मराठीच्या अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळविण्यास व त्याचे विश्लेषण करण्यास मदत करणे.

४. मराठी पाठ्यपुस्तकाचे चिकित्सक परीक्षण करण्यास तसेच आशय विश्लेषणास मदत करणे.

५. मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती, प्रयुक्त्या व तंत्रे यांचे आकलन होण्यास मदत करणे.

६. मराठीचे अध्यापन करताना विविध अध्ययन अनुभवांची व अध्यापन साहित्याची मदत घेण्यास प्रवृत्त करणे.

७. भाषा अध्यापनाचे नियोजन व संघटन करण्याचे कौशल्य प्राप्त करण्यास मदत करणे.

८. विद्यार्थ्यांच्या गरजानुरूप पाठाची विविध प्रकारची टाचणे तयार करण्याचे कौशल्य प्राप्त करण्यास मदत करणे.

९. मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन कसे करावे या विषयीचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

१०. मूल्यमापनाची तंत्रे समजण्यासाठी व त्यांचा उपयोग करण्यासाठी मदत करणे.

११. भाषा शिक्षक म्हणून अपेक्षित गुणविशेष समजण्यास व ते गुणविशेष आणि कौशल्ये प्राप्त करण्यास मदत करणे.

0000

२.५ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाच्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे :-

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाची उद्दिष्ठे सफल करुन त्याचे कौशल्य आत्मसात करणे हे शिक्षणशास्त्र पदवी घेणा-या प्रशिक्षणार्थीचे आद्य कर्तव्य आहे. मराठी अध्यापन पद्धती ही अभ्यासक्रमातील एक स्वतंत्र, महत्वाची व आद्यक्रमांकाची पद्धती आहे. मराठी अध्यापन पद्धती मधील उद्दिष्टांची स्पष्टीकरणे ही प्रशिक्षणार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन घडवून आणतात. त्यामुळे त्यांना शब्दांचा अर्थ समजून, त्यातील सूचित अर्थ, अनुभूतीची उत्कटता, दु:खाची आर्तता, मर्म, विनोद बोचरा उपरोध समजू शकतो.

उद्दिष्टांची स्पष्टीकरणे म्हणजे प्रत्येक उद्दिष्टांतर्गत अपेक्षित असलेल्या वर्तन परिवर्तनाची मांडणी उद्दिष्टे आणि त्यांची स्पष्टीकरणे नीट समजली की प्रशिक्षणार्थ्यांच्या कोणत्या प्रवृत्तीचा अभ्यास करावयाचा आहे. वर्तनात कोणते परिवर्तन करावयाचे आहे. याचे शिक्षकांना स्पष्ट ज्ञान होते. त्यादृष्टीने अध्यापनाची दिशा ठरविता येते. मागे विवेचन केलेल्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे पुढील प्रमाणे देता येतील.

(१) प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पद्धतीचे अभ्यासक्रमातील बालकाच्या शिक्षणातील स्थान आणि महत्त्व समजावून घेतो.

(२) मराठी अध्यापन पद्धतीचे हेतू ओळखतो. तसेच मराठी अध्यापन पद्धतीची उद्दिष्टे सांगतो.

(३) प्रशिक्षणार्थी मराठीच्या अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळवितो व त्याचे विश्लेषण करतो.

(४) प्रशिक्षणार्थी मराठी पाठ्यपुस्तकांचे चिकित्सक परिक्षण करतो. तसेच आशय विश्लेषणाही करतो.

५) प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती सांगतो.

६) प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पद्धतीसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध प्रयुक्त्या आणि तंत्रे यांची माहिती मिळवितो.

७) प्रशिक्षणार्थी मराठीचे अध्यापन करताना विविध अध्ययन अनुभव देण्याची अभिरुची निर्माण करतो.

८) प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पद्धतीसाठी वापरल्या जाणाऱ्या विविध अध्यापन साहित्याचे संकलन करतो.

९) प्रशिक्षणार्थी भाषा अध्यापनाचे नियोजन करतो. तसेच तो संघटनाचे कौशल्य दाखवितो.

१०) प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या गरजानुसार पाठाची विविध प्रकारची टाचणे तयार करण्याचे कौशल्य प्राप्त करतो.

११) प्रशिक्षणार्थी मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन कसे करावे हे आकलन करुन घेतो.

१२) प्रशिक्षणार्थी मूल्यमापनाची तंत्रे समजावून घेतो. तसेच त्यांचा विविध ठिकाणी उपयोग करतो.

१३) प्रशिक्षणार्थी भाषा शिक्षकांच्या अंगी असणारे गुणविशेष आत्मसात आणतो तसेच ते गुणविशेष समजावून घेतो.

वरील प्रमाणे शिक्षणशास्त्र पदवी घेणारा प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील उद्दिष्टांची स्पष्टीकरणे आत्मसात आणून ती संपादन करण्याचे कौशल्य मिळवितो.

## प्रथम भाषा मराठी अध्यापन पद्धतीची उद्दिष्टे :-

मराठी भाषा आपण का शिकवावी याची उद्दिष्टे आहेत. मराठी अध्यापन पद्धतीचे महत्वाचे उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना मराठी भाषेची शास्त्रशुध्द व्यवस्थित क्रमवार सांगोपांग दृढ ओळख करुन देणे हे आहे. मराठी अध्यापनाची उद्दिष्टे खाली नमूद केल्या प्रमाणे सांगता येतील.

### -:मराठी अध्यापनाची उद्दिष्टे :-

- भाषिक उद्दिष्टे
  - ग्रहणात्मक
    - श्रवण
    - वाचन
  - प्रकटीकरणात्मक
    - भाषण
    - लेखन
- वाङ्मयीन उद्दिष्टे
  - रसग्रहणात्मक
  - सृजनात्मक

भाषिक उद्दिष्टांमध्ये भाषा समजणे व तिचा उपयोग करता येणे हे महत्वाचे असते.

भाषा कळणे, भाषा समजणे, म्हणजे भाषेची ग्रहणशक्ती होय. भाषा वापरता येणे, लिहिण्यात , बोलण्यात , वाचण्यात, ऐकण्यात सर्व भाषिक क्रियात आपल्याला जे काही वाटते ते निरनिराळ्या शब्दात व्यक्त करणे म्हणजे भाषा प्रकट करण्याची शक्ती होय.

भाषेची गृहणात्मक उद्दिष्टे ग्रहण शक्तीवर आधारित आहेत तर प्रगटीकरणात्मक उद्दिष्टे प्रकटीकरणाच्या शक्तीवर आधारीत आहेत. भाषेच्या ग्रहण शक्तीत, ऐकलेले समजणे म्हणजे श्रवण हे बाह्य जगातले ज्ञान ग्रहण करण्याचे डोळ्याइतकेच महत्वाचे साधन आहे. सावधान श्रवण हे केवळ वक्त्यांच्या वक्तृत्वा अवधानाचा चारा नसून श्रोत्याच्या बुध्दीला अन्न पुरवीत

असते. विचाराला खाद्य देत असते. लिहिलेले कळणे म्हणजे वाचन दुस-याच्या च्या लिहिण्यातील आशय नीट समजून घेणे हा वाचनाचा प्रधान उद्देश. सर्व प्रधान उद्देश, सर्व ज्ञानभांडाराच्या किल्ल्या वाचन शक्तीच्या आधीन असतात. वाचनामुळे तृप्त होणा-या व्यावहारिक गरजा अनंत असतात. वाचनाचे उद्दिष्ट म्हणजे दुस-याच्या लेखनातील आशय समजून घेण्याचे सामर्थ्य येणे.

आपल्यासाठी दुस-यांनी कार्य करावयास हवे आपल्या सर्व इच्छा - आकांक्षा तसेच आपण जे काय ऐकले व वाचले त्यावर झालेल्या प्रतिक्रिया प्रथम बोलण्याद्वारे व्यक्त होतात. स्वत:ला जे काही वाटते ते व्यक्त करणेसाठी आवश्यक असलेले भाषिक सामर्थ्य विद्यार्थ्यांत निर्माण करणे हे भाषेच्या अध्यापनाचे मूलभूत कार्य आहे. हे कार्य भाषिक उद्दिष्टे साध्य करण्याचे प्रयत्न आहेत.

ग्रहणात्मक उद्दिष्टे म्हणजे विद्यार्थ्यांची भाषा कळण्याची शक्ती विकसित करणे, विद्यार्थ्यांना शब्दार्थ समजणे, अर्थाच्या निरनिराळ्या सूक्ष्म छटा कळणे, संदर्भानुसार विशिष्ठ अर्थ कळणे, शब्दामागील ऐतिहासिक सांस्कृतिक पार्श्वभूमी समजणे, वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते इत्यादींचे अर्थ कळणे, योग्यवेळी हे अर्थ वापरता येणे, ग्रहणात्मक उद्दिष्टात अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची ग्रहणशक्ती जाणून घेऊन ती उद्दिष्टे साध्य होण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, आवश्यक असते. शब्दांचे आर्थाकिलन भावनांचे विचारांचे ग्रहण जेवढे सुलभ होईल. तेवढी ग्रहणात्मक उद्दिष्टे साध्य होतील असे समजले जाते.

दुसरी पायरी म्हणजे जे लेखकाने / कवीने लिहिलेले आहे. आणि वक्त्याने सांगितले आहे. त्यातील मध्यवर्ती कल्पना आणि इतर उपमुद्दे चटकन समजता आले पाहिजेत. आशय, दृष्टीकोनही दडलेला / सूचविलेला अर्थ विद्यार्थ्यांना कळला पाहिजे.

भाषा समजण्यासाठी विद्यार्थ्यांची विचारांची कल्पनांची शक्ती विकसित झाली पाहिजे. अध्यापनातून या शक्तींना चालना मिळाली तर विद्यार्थ्यांची भाषा समजण्याची क्षमता वाढीस लागेल.

प्रकटीकरणाचे उद्दिष्ट - स्वतःचे विचार, भावना, कल्पना, मते, अनुभव, दृष्टीकोन व्यक्त करणे हे आहे. प्रकटीकरणाचे दोन पद्धती आहेत.

१. लेखी २) मौखिक

या दृष्टीने शुद्ध लेखन व शुद्ध भाषण ही पहिली पायरी आपले विचार, भावना कल्पना थोडक्यात मुद्देसूदपणे, व परिणामकारकपणे व्यक्त करता येते ही पुढची पायरी हे कौशल्य प्राप्त होण्यासाठी सुयोग्य शब्दांचा, वाक्प्रचारांचा, म्हणी - सुभाषितांचा प्राप्त ज्ञानातील अनुरूप संदर्भांचा नेमका व यथोचित उपयोग करण्याची पात्रता, तसेच एखाद्या मुद्द्यांचे कल्पनेचे स्पष्टीकरण / त्याचा विस्तार करण्याचीही क्षमता निर्माण व्हावयाला हवी. तसेच वर्णन कौशल्य निवेदन कौशल्य, स्पष्टीकरण व विवेचन कौशल्यही निर्माण व्हावयाला हवे.

लेखनामध्ये हे कौशल्य वाक्यरचना, परिच्छेदलेखन, निबंधलेखन, प्रश्नांचा उत्तराचे लेखन, सारांश लेखन, पत्रलेखन इत्यादी स्वरूपात क्रमवार निर्माण केले जाऊ शकते.

वाङ्मयीन उद्दिष्टे :-

रस, सौंदर्य, अनुभूती आणि कलात्मकता ही वाङ्मयीन कलाकृतीची मूलतत्वे आहेत. तिचा गाभा आहे. जेव्हा रसिक वाचक ही कलाकृती वाचतो तेव्हा त्याने तिचा आस्वाद घ्यावा. या मूलतत्वाचा त्याच्या मनावर सूक्ष्म परिणाम व्हावा ही अपेक्षा असते. वाङ्मयीन उद्दिष्टांचे दोन प्रकार आहेत.

१) रसग्रहणात्मक किंवा सौंदर्यानुभूतीपर उद्दिष्टे

२) सृजनात्मक उद्दिष्टे

वाङ्:मयवाचा हेतुः उच्चतर :-

कलात्मक आनंद मिळविणे हा आनंद होण्याची पात्रता विद्यार्थ्यांत निर्माण करणे हा वाङ:मयाच्या अध्यापनाचा खरा हेतु आहे. रस किंवा सौंदर्य हा वाङ:मयाचा आत्मा आहे. शिक्षकांनी रसास्वादाची क्षमता विद्यार्थ्यांत विकसित केली पाहिजे. विद्यार्थ्यांत सौंदर्यदृष्टी, सद्भिरुची, रसिकता या मन:प्रवृत्तींचा व शक्तीचा जर योग्य स्वरूपात विकास झाला असेल तर त्यांच्या विचार आणि कल्पना शक्तीचा विकास झाला असेल. शिक्षक प्रत्यक्ष अध्यापनातून त्याचे जीवन दर्शन घडवितात. कलाकृतीतून दिसणा-या सौंदर्याची प्रचिती आणून दयावी लागेल त्यासाठी विद्यार्थ्यांना सुसंस्कारशील बनवावे लागेल. यादृष्टीने वाङ्:मयाचा अध्यापक हा प्रत्यक्ष कलाकृती व विद्यार्थी यांच्या संबंध प्रस्थापित करणारा महत्वाचा दवा असतो. तसेच ते प्रति कलावंत असतात.

सृजनात्मक उद्दिष्टे :-

नवीन काही तरी कलात्मक चांगले निर्माण करणे, ते अभिव्यक्त करणे, ते कायात दिसणे म्हणजे सृजन, सुंदर स्वतंत्र, मौलिक लिहिण्याची प्रेरणा विद्यार्थ्यांत निर्माण करावी लागते. सुंदर शब्दांची योजना, अलंकार, सुभाषिते, वचने यांची मांडणी आणि त्यांचा प्रत्यक्ष उपयोग करावयास लावणे यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे हे सृजनात्मक उद्दिष्टाचे खरे स्वरूप आहे.

सृजनशीलता म्हणजे प्रकटीकरणाची उच्च व कलात्मक पातळी, रसानुभूती किंवा सौंदर्यानुभूती ही वाङ्:मयीन उद्दिष्टांची आस्वादात्मक बाजू आणि सृजनशीलता ही निर्मिक बाजू आहे.

वरील उद्दिष्टांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण करता येईल.

१) ज्ञान
३) उपयोजना
५) प्रकटीकरण - कौशल्य
२) आकलन
४) रसग्रहण
६) अभिवृत्ती
७) सृजनशीलता

२:६ मराठी अध्यापन पद्धतीच्या सैद्धान्तिक भागाच्या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे :-

उद्दिष्टांचे स्पष्टीकरण म्हणजे प्रत्येक उद्दिष्टांतर्गत अपेक्षित असलेल्या वर्तन परिवर्तनाची मांडणी, उद्दिष्टे आणि त्यांची स्पष्टीकरणे नीट समजलीकी विद्यार्थ्यांच्या कोणत्या प्रवृत्तीचा विकास करावयाचा आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनात कोणते परिवर्तन करावयाचे आहे याचे शिक्षकांना स्पष्ट ज्ञान होते. त्या दृष्टीने अध्यापनाची दिशा ठरविता येते. वरील उद्दिष्टांची स्पष्टीकरणे पुढील प्रमाणे देता येतील.

ज्ञान आणि आकलन :-

(१) शब्दांच्या संपत्तीत भर घालणे, नवे समनार्थी, विरुद्धार्थी शब्द जाणणे, शब्दभेद जाणणे, शब्दामागील पार्श्वभूमी जाणणे, विग्रह करुन शब्दांचा अर्थ लावणे, या क्रिया या उद्दिष्टात अपेक्षित आहेत.

(२) वाचन क्षमता :-

या क्षमतेने अर्थपूर्ण वाचन करणे, स्पष्ट उच्चार करणे, योग्य विराम-चिन्हासह वाचणे, अर्थानुरुप चढउतार करणे, सुयोग्य रितीने वाचणे, या वृत्तीचा विचार करतात.

(३) श्रवण क्षमता :-

अर्थपूर्ण ऐकणे, आशय दृष्टिकोन अर्थाकलन, वाङ्‌मयाचा परिचय घडविणे, शुद्धलेखनाचे नियम कळणे, रस, अलंकार, वृत्ते यांचा परिचय होणे या क्रियांचा समावेश होतो.

मौखिक प्रकटीकरण :-

१) शुद्ध आणि स्पष्ट उच्चार करणे, व्यावहारिक संभाषण करता येणे, आपले विचार व भावना व्यवस्थित मांडता येणे, कथा सांगता येणे, स्वागतपर,

परिचयात्मक, आभाराचे भाषण करता येणे, एखाद्या विषयावर सुव्यवस्थित भाषण करता येणे, निर्दोष प्रकट वाचन करता येणे, विरामचिन्हांचा भाषणात योग्य वापर करणे, शुध्द उच्चार करणे, अर्थपूर्ण, भावपूर्ण वाचता येणे या अपेक्षा मौखिक प्रकटीकरणाच्या बाबतीत विद्यार्थ्यांना केल्या जातात.

लेखी प्रकटीकरण :-

सुवाच्य आणि वळणदार हस्ताक्षर काढणे, शुध्द लिहिता येणे, व्याकरणाचे दृष्टीने शुध्द वाक्यरचनाकरता येणे, समर्पक शब्दांचा उपयोग करता येणे, मुद्देसुद लिहिता येणे, कल्पना विस्तार, सारांशलेखन, वर्णनात्मक लेखन करता येणे, निबंध लेखनात सहजता येणे या क्रिया अपेक्षित आहेत.

रसास्वाद :-

या उद्दिष्टात साहित्याचा आस्वाद घेता येणे साहित्यातील सौंदर्य, भाव, रस याची अनुभूती घेता येणे, कलाकृतीतील मूल्यांचे संस्कार घेता येणे, अभिनय, नाटयवाचन करता येणे, काव्यवाचन, गायन करता येणे या गोष्टींचा समावेश करता येतो.

अभिव्यक्ती :-

साहित्याची, वाचनाची आवड निर्माण होणे, ग्रंथालयातुन साहित्याच्या संबंधीची पुस्तके घेऊन वाचता येणे, कविता, श्लोक, सुवचने पाठ करणे, साहित्य साहित्यिक यांची माहिती मिळवून त्यासंबंधी चर्चा करणे, वाङ:मयीन कार्यक्रमात सहभाग घेणे, मराठी भाषा, साहित्याबद्दल प्रेम, आदर, कृती आणि उक्तीतून व्यक्त करता येणे या अपेक्षा आहेत.

सृजनशीलता :-

सुंदर अर्थवाही शब्द, वाक्प्रचार, म्हणी, वचने, सुभाषिते,काव्यपंक्ती यांचा उपयोग करून लेखन सुंदर, आकर्षक व परिणामकारक करता येणे, शब्दकोडे, समस्या पूर्ती, कथापूर्ती अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी भाग घेणे, वर्गा तर्फे व शाळे तर्फे हस्तलिखित लेख देणे, शालेय निबंध स्पर्धेत भाग घेणे हे सृजनशीलतेचे वैशिष्ठ्य आहे.

शिक्षण म्हणजे सर्वांगीण विकास" अध्यापन ही विकासाची प्रक्रिया आहे. अध्यापनाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांच्या विविध मन:शक्तीचा वृत्तीचा विकास घडविणे, विद्यार्थ्यांच्या अनेक मानसिक शक्ती आणि प्रवृत्ती जागरुक करून त्यांना चालना देणे व प्रत्येक विद्यार्थ्यामधून बुध्दिमान, कार्यक्षम, सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व निर्माण करणे हेच शिक्षणाचे खरे ध्येय आहे.

स्वतंत्रपणे विचार करण्याच्या दृष्टीने भाषेची दोन प्रमुख कार्ये आहेत.

(१) भाषा समजणे.

(२) भाषेचा वापर करणे.

भाषेच्या अध्यापनाचे मूलभूत कार्य, उद्दिष्ट, म्हणजे रोजच्या व्यवहारात सर्व प्रकारच्या स्वत:च्या प्रकटीकरणासाठी आवश्यक ते भाषिक सामर्थ्य प्रत्येक विद्यार्थ्यात निर्माण करणे हे आहे. स्वतंत्र विचार करणे, स्वत:च्या भावना, विचार, मते, अनुभव, प्रकट करणे म्हणजेच आत्मप्रकटीकरण, लेखी आणि भाषण स्वरुपात आपण आत्मप्रकटीकरण करू शकतो.

लेखी म्हणजे शुध्दलेखन लेखी कौशल्ये प्राप्त करण्यासाठी शाळेत हस्ताक्षर सुधारणे, हस्ताक्षरस्पर्धेचे आयोजन, -हस्वदीर्घ , जोडाक्षरे यांचे शुध्दलेखन बाबतीत शिक्षकांनी दक्ष हवे. श्रुतलेखन, वाक्यरचना, विविध लेखन प्रकाराचा दैनंदिन सराव याकडे विशेष लक्ष प्राध्यापकानी दयायला पाहिजे.

मौखिक म्हणजे आपले विचार, भावना, कल्पना थोडक्यात मुद्देसुदपणे व्यक्त करता येणे ही कौशल्ये मिळविण्यासाठी सुयोग्य शब्द, वाक्य प्रचार म्हणी सुभाषित, शालेय अनुभावाचा योग्य ठिकाणी उपयोग करणे, एखाद्या मुद्याचे कल्पनेचे स्पष्टीकरण त्याला करता आले पाहिजे. मौखिक पातळीवर संभाषण, कथन, निवेदन, चर्चा, वादविवाद, भाषण इत्यादीद्वारे विद्यार्थ्यांना आपले विचार मांडता येणे, प्रत्येक शब्दाचा स्पष्ट आणि शुध्द उच्चार करता येणे, ही मूलभूत गोष्ट आहे. प्रश्नांची तोंडी उत्तरे देणे, याला वाव हवा. विद्यार्थ्यांना शुध्द आणि स्पष्ट वाचता येणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षकाचे वाचन यासाठी आदर्श पाहिजे. बोलणे, चर्चा, कथन, वर्णन, वक्तृत्व यांची संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध हवी आणि योग्य प्रयत्नाद्वारे सुधारणा करावी.

सृजनशीलता म्हणजे नवनिर्मिती, अस्खलितपणा लवचिकता, मौलिकता व्यक्तिवैशिष्ठ्ये, कल्पकता, सौंदर्य, कलात्मकता यांचा अविष्कार होय. ती सृजनात्मक निर्मिती आहे. ही नवनिर्मितीची प्रेरणा विद्यार्थ्यात मुळात असते. तीच सृजनशीलता आहे. स्वत:चा आशय व्यक्त करण्यासाठी माणूस धडपडतो. आणि मनातील शक्तीचा वृत्तीचा विकास या धडपडीतून होतो. व्यक्तीच्या विकासाचे, आविष्काराचे, सृजनशीलता हे माध्यम आहे.

व्यक्तीच्या क्षमते प्रमाणे निर्मिती होते. त्यावर कल्पकतेचा, सौदर्याचा साज चढतो. तीच व्यक्तीची सृजनशील अभिव्यक्ती आहे. या अभिव्यक्तीसाठी प्रत्येक विद्यार्थी धडपडतो. प्रत्येक विद्यार्थ्यात कमी अधिक प्रमाणात कल्पकता, सौंदर्यदृष्टी, कलाभिरुची असते. सृजनशील विकास शिक्षणात महत्वाचा असतो. भाषिक पातळीवर या सृजनशीलतेचा आविष्कार भाषण लेखनाद्वारे होतो. सुंदरता, आकर्षता, कल्पकता वैचारिकता, यांचा अविष्कार करणारे लेखन म्हणजे सृजनशील लेखन आहे.

विद्यार्थ्यांचा सृजनात्मक विकास करणे म्हणजे त्याच्या भाषिक प्रकटीकरणास कलात्मक स्वरुप देणे. विद्यार्थ्यांत सुंदर लेखनाची पात्रता निर्माण करणे. त्यांच्या लेखन क्षमतेचा विकास करणे हे एक महत्वाचे उद्दिष्ट आहे.

सुंदर भाषा लिहिण्यास विद्यार्थ्यांना शिकवायला हवे. यथोचित सुदंर शब्दांची योग्य योजना, अलंकार, सुभाषिताचा, वचनांचा वापर हे भाषा सौंदर्याचे प्रमुख घटक आहेत. विद्यार्थ्यांना भाषेवर सौंदर्याचा साज कसा चढविता येईल. साधे वाक्य सुंदर पध्दतीने कसे लिहिता येईल. याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली पाहिजे.

.........

## २:६ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाची कार्यवाही :

मराठी अध्यापन पद्धतीच्या सैद्धान्तिक भागात सर्व प्रथम येणारा घटक अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान असा आहे. यामध्ये "अ" आणि "ब"मध्ये मराठी अध्यापन पद्धतीचे स्थान तसेच मराठी अध्यापन पद्धतीचा इतर अध्यापन पद्धतीशी असलेला सहसंबंध असे दोन उपघटक दिलेले आहेत. हा घटक अभ्यासक्रमात घालण्याचा उद्देश म्हणजे मराठी मातृभाषाचे अभ्यासक्रमातील तसेच बालकाच्या शिक्षणातील स्थान समजावून घेता येते. तसेच त्रिभाषा सूत्राचा वापर प्रत्यक्ष कार्यवाहीत कसा केला जातो हे समजण्यास मदत होते.

हा भाग प्रशिक्षणार्थ्यांनाप्रशिक्षकांच्या कडून व्याख्यान पद्धतीने समजावून दिला जातो. कमीतकमी वेळेत, अधिकाधिक पाठ्यांश शिकविल्यामुळे प्रशिक्षणार्थी संबंधीत अध्यापन पद्धतीचा लाभ घेतात आणि उत्तम वक्ते बनण्याची त्यांना संधी प्राप्त करता येते.

तसेच त्यांना या घटकाच्या अभ्यासावरून . . .

(१) मराठी भाषा : विचारांची जनक व विचारांची वाहक

(२) मराठी भाषा : भावनिक विकासाचे साधन

(३) मराठी भाषा : संस्कृती संवर्धनाचे साधन

(४) मराठी भाषा : जीवनाची सार्थीदारीन

(५) मराठी भाषा : केवळ एक विषय नव्हे

(६) मराठी भाषा : आज राज्यभाषा

(७) मराठी भाषा : नव्या आव्हानांचे भान

ही माहिती मिळविता येते. आणि मराठी अध्यापन पध्दतीचा- हिंदी, इंग्रजी, सायन्स, गणित, भूगोल, इतिहास, वाणिज्य, अर्थशास्त्र या पध्दतीशीही जवळचा सहसंबंध आहे हे समजते.

मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमांतर्गत येणारा दुसरा घटक "मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे असा आहे. यामध्ये "अ" "ब" "क" असे तीन उपघटक घातलेले आहेत. हा घटक अभ्यासक्रमात घालण्याचा हेतू मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे याबाबतचे प्रशिक्षणार्थ्यांस ज्ञान मिळविण्यास मदत व्हावी हा आहे.तसेच "ब" उप घटकाचा उद्देश मराठी अध्यापनाची वर्ग उद्दीष्टे व त्यांची स्पष्टीकरणे संपादन करता यावीत हा आहे. "क" घटकाच्या अभ्यासामुळे त्यास महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांतील नियुक्त अभ्यासक्रमाची उद्दिष्टे समजण्यास मदत होईल.

हा घटक उद्गामी व अवगामी पध्दतीने शिकविला जातो. कारण यामध्ये विशिष्टाकडून सामान्याकडे किंवा सामान्य तत्वाकडून विशिष्ठ तत्वाकडे जाता येते. त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना त्यांचे चांगले आकलन करुन घेता येते.

प्रशिक्षणार्थ्यांना या घटकाच्या अभ्यासा नंतर रसग्रहण, विविध साहित्याचा परिचय, लेखनाद्वारे किंवा मौखिक प्रकटनाद्वारे अभिव्यक्ती करता येते. मराठी अध्यापनाची वर्ग उद्दिष्टे माहित होतात. आणि महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांतील नियुक्त अभ्यासक्रमाची उद्दिष्टे आकलन होतात / सांगता येतात.

संबंधित अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात येणारा "तिसरा घटक " मराठी अभ्यासक्रम व पाठ्यक्रमपुस्तके असा आहे. हा घटक अभ्यासक्रमात घालण्याचा हेतू मराठीच्या अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळविण्यास व त्याचे विश्लेषण करण्यास मदत करणे हा आहे. या तिसऱ्या घटकामध्ये तीन उपघटकांचा समावेश केलेला आहे. क्रमाने उपघटकात चांगल्या अभ्यासक्रमाचा लक्षणे व प्रकार आहेत. त्यानंतर ५ वी ते १० वा. च्या नियुक्त अभ्यासक्रमाचे चिकित्सक परीक्षण, गद्य, पद्य व व्याकरणा-विषयक तपशिल, पुरवणी वाचन अभ्यासपूरक कार्यक्रम व गुणदोष हा उपघटक आहे.

हा उपघटक घालण्याचा हेतू - पुरवणीचे वाचन करता यावे. ५ वी ते १० वी. च्या कोणत्याही मराठी पाठ्यपुस्तकाचे चिकित्सक परिक्षण करता यावे. गद्याचे वाचन व्हावे, पद्याचे रसग्रहण करता यावे किंवा त्यातील भावार्थ, व्याकरण यांची ओळख व्हावी. असा आहे. या तिस-या घटकातील तिसरा उपघटक फारच व्यापक आहे. याचा हेतू प्रशिक्षणार्थ्यांना मराठीच्या चांगल्या पाठ्यपुस्तकाची लक्षणे समजावीत. पाठ्यपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करता यावा. तसेच ५ वी. ते १०वी पैकी कोणत्याही मराठी भाषेच्या पाठ्यपुस्तकातील आशय विश्लेषण करता यावे हा आहे.

हा घटक प्राध्यापक वर्ग आशययुक्त अध्यापन पद्धतीचे कृतिसत्र चालू होण्यापूर्वी म्हणजे सत्र समाप्तीपूर्वीच्या आठवड्यात प्रत्यक्ष कृती ,कथन, प्रश्नोत्तर, चर्चा या तंत्राचा वापर करुन शिकवितात . त्यामुळे या घटकाची कार्यवाही व्यवस्थित करता येते.

प्रशिक्षणार्थी हा घटक अभ्यासल्या नंतर चांगल्या अभ्यासक्रमाची लक्षणे व प्रकार सांगू शकतो. मराठी भाषेतील ५ वी ते १० वी च्या नियुक्त अभ्यासक्रमाचे चिकित्सक परीक्षण करतो. तसेच चांगल्या मराठीच्या पाठ्यपुस्तकाची लक्षणे ओळखून त्याचे आशय विश्लेषण करतो.

मराठी अध्यापन पद्धतीच्या चौथ्या घटकात मराठी अध्यापन पद्धतीच्या विविध पद्धती प्रयुक्त्या व तंत्रे यांचा समावेश केलेला आहे. हा घटक घालण्याचा हेतू - प्रशिक्षणार्थ्यांस मराठी अध्यापनाच्या विविध पद्धती, प्रयुक्त्या व तंत्रे यांचे आकलन व्हावे हा आहे. या घटकात "अ" "ब" "क" "ड" असे ४ उपघटक समाविष्ट केलेले आहेत. "अ" या उपघटकात अध्यापकांचा सूत्रे आहेत. "ब" मध्ये अध्यापन पद्धती, "क" मध्ये अध्यापनाच्या प्रयुक्त्या तर "ड" उपघटकात अध्यापनाची तंत्रे दिलेली आहेत.

प्राध्यापक वर्गाकडून ह्या घटकाचे अध्यापन कथन पद्धती द्वारा केले जाते. प्रभावी कथनाने हा भाग सोपा करून सांगता येतो.

प्रशिक्षणार्थ्यांनी अभ्यास केल्यानंतर त्यांना मराठीच्या विविध अध्यापन पद्धती आकलन करून त्या स्तरानुसार कशा वापराव्यात याचे ज्ञान प्राप्त होते. तसेच अध्यापनाची विविध सूत्रे अध्यापन परिणामकारक करू शकतात. आणि तंत्राचा वापर केल्याने अध्यापनातील कौशल्य संपादन करण्यास मदत होते.

पाचव्या घटकात मराठी अध्यापन पद्धतीचे अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य याचा समावेश केलेला आहे.

हेतू :- मराठीचे अध्यापन करताना विविध अध्ययन अनुभव प्राप्त करता यावेत. तसेच वेगवेगळे अध्यापन साहित्य कोणत्या ठिकाणी कसा प्रकारे वापरावे हे समजते.

हा घटक शिकविण्यासाठी व्याख्यान पद्धतीचा वापर केला जातो. त्यामुळे वेळेची बचत करता येते. प्रशिक्षणार्थी विविध मुद्द्यांची टिप्पणे घेतो. तसेच यामध्ये पर्यवेक्षित तंत्राचा वापर करता येतो. त्यामुळे विविध ठिकाणचे अध्यापन साहित्य सूक्ष्मरितीने निरीक्षण करता येते.

प्रशिक्षणार्थ्याला हा घटक अभ्यासल्या नंतर अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक उपक्रमात सहभागी होता येते. विविध उपलब्ध साहित्यांचा अभ्यास करतो. नवनिर्मितीमधून साधनाची निर्मिती करतो. सांस्कृतिक कौशल्ये प्राप्त करतो. (भावगित )

घटक :- ६

मध्ये अध्यापनाचे नियोजन व संघटन केलेले आहे. यामध्ये ४ उपघटक समाविष्ट केले आहेत.

हेतु :- १) भाषा अध्यापनाचे नियोजनव संघटन करण्याचे कौशल्य प्राप्त करणे हा आहे.

२) विद्यार्थ्यांच्या गरजानुरूप पाठाची विविध प्रकारची टाचणे तयार करण्याचे कौशल्य प्राप्त करता येते.

यासाठी उदगामी व अवगामी पद्धतीचा वापर करून चर्चा, कथन, स्वाध्याय तंत्रे, समाविष्टकेली जातात. तसेच प्रश्न, दाखले, नाट्यकिरण, स्पष्टीकरण या प्रयुक्त्यांचा वापर केला जातो.

यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना अध्यापनाचे वार्षिक, घटक व दैनंदिन नियोजन करता येते. पाठांचे विविध प्रकार समजतात. विविध शैक्षणिक अनुभव संपादन करता येतात.

घटक - ७ मध्ये मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन" या भागाचा समावेश केला आहे. या घटकात ५ उपघटकाचा भाग युक्त आहे.

हेतू - मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन कसे करावे, याविषयीचे ज्ञान मिळविता येते.

अध्यापन - पद्धती - उदगामी व अवगामी तंत्रे, कथन, प्रश्नोत्तर, चर्चा यांचा वापर करून स्पष्टीकरणाची प्रयुक्ती वापरता येते.

मराठी अध्यापन पद्धती मधील घटक ८ - "मूल्यमापन पद्धती" हा आहे. या घटकात पुन्हा ३ उपघटकाचा समावेश केला आहे.

हेतु :- मूल्यमापनाची तंत्रे, समजावून घेऊन त्याचा उपयोग करणे हा आहे.

अध्यापन पद्धती - परिसंवाद / कथन प्रश्नोत्तर, चर्चा तंत्राचा वापर करता येतो.

हा घटक अभ्यासल्यानंतर प्रशिक्षणार्थी माध्यमिक शाळेतील मराठी विषयाची घटक चाचणी घेऊ शकतो. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यातील चुका शोधून काढून त्यासंबंधीचे निदानात्मक / उपचारात्मक कार्य करतो.

संबोधित अध्यापन पद्धतीमधील शेवटचा ९ वा. घटक "भाषा शिक्षक" हा आहे. या घटकात ३ उपघटकाचा समावेश केला आहे.

हेतु - प्रशिक्षणार्थ्यांना भाषा शिक्षकाचे गुणविशेष आणि कौशल्ये प्राप्त करता यावीत. हा आहे.

अध्यापन पद्धती :-

व्याख्यान पद्धती चर्चा, प्रश्नोत्तर तंत्राचा समावेश करता येतो.

हे घटक अभ्यासल्यानंतर मराठी अध्यापनाची पद्धती अभ्यासणारा, व अपेक्षित गुणवैशिष्ठे धारण करणारा एक महान शिक्षक तयार होवू शकतो.

वरील प्रमाणे मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील सैद्धान्तिक भागाची कार्यवाही प्रत्यक्षात आणता येते.

0 0 0 0 0 0

## २:७ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचा प्रात्यक्षिक भाग :-

### १. सैद्धान्तिक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिक काम :-

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पद्धती घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यास प्रात्यक्षिक कार्याचा एक भाग म्हणून पुढील पैकी कोणत्याही एका विषया सैद्धान्तिक पेपरशी निगडीत कोणतेही एक प्रात्यक्षिक लिहावे लागते. या प्रात्यक्षिकाचे विषय पुढे दिल्या प्रमाणे आहेत.

१, कोणत्याही भाषिक कौशल्याच्या एका घटकावर निदानात्मक कसोटी तयार करणे.

२. शाळेतील विद्यार्थ्यांच्या समवेत हस्तलिखित तयार करणे.

३. शाळेत मातृभाषेच्या अध्यापनाला योग्य अशा एका अभ्यासानुवर्ती उपक्रमाचे आयोजन करणे.

४. मातृभाषेच्यासंदर्भात कोणत्याही एका विषयावर भित्तीपत्रक तयार करून लावणे.

५. मातृभाषेतील कोणत्याही एका घटकाचे घटक नियोजन करून त्याची घटक चाचणी तयार करणे.

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील बी. एड्. पदवीशी निगडीत पूर्वावश्यक तयारीचा भाग म्हणून " ( ५00 मार्कांचे समांतर श्रेणीत ) विविध प्रात्यक्षिक कार्ये पूर्ण करावी लागतात. त्यापैकी क्रमवार प्रात्यक्षिक कार्य पुढील प्रमाणे सांगता येतील.

### १. (अ) सूक्ष्माध्यापन प्रशिक्षण कार्यक्रम :-

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी खालील पाच गटापैकी शक्यतो. प्रत्येकी एक याप्रमाणे पाच अध्यापन कौशल्याचा निवड करावी लागते.

गट = १ / कथन - स्पष्टीकरण -

गट - २ / मूलभूत प्रश्नपद्दती / मुक्त प्रश्न / प्रत्याभरणासाठी
प्रश्न पद्दती / शोधक प्रश्न पद्दती

गट - ३ शिक्षक प्रतिक्रिया / प्रबलन

गट - ४ चेतक बदल / फलकाचा वापर

गट - ५ सज्जता / प्रवर्तन / समारोप

एकात्मिकरणाचा १५ ते २० मिनिटांचा एक पाठ घ्यावा. लागतो. यात पाच कौशल्या पैकी किमान तीन कौशल्याचे एकात्मीकरण होणे आवश्यक असते.

१:ब) सराव पाठ प्रशिक्षण व शालेय अनुभव कार्यक्रम हे वर्षभर चालणारे प्रात्यक्षिक काम करतो. स्थूल मानाने या प्रात्यिक्षिकात खालील चार बाबीचा समावेश होतो.

(अ) प्रात्यक्षिकासाठी तात्त्विक प्रशिक्षण

(ब) सुटे सराव पाठ कार्यक्रम

(क) सलग सरावपाठ कार्यक्रम

(ड) शालेय अनुभव कार्यक्रम

सरावपाठासाठी ि तात्त्विक प्रशिक्षणाचे कामातुन संबंधित व्याख्याने पूर्ण केली जातात. तात्त्विक माहिती देऊन झाल्यावर प्रत्येक विषयाचा किमान एक दिग्दिशत नमुना पाठ आयोजित करावा लागतो त्यावर चर्चा घडवून आणावी लागते.

प्रशिक्षणार्थ्यांस पहिले बारा ( ६ + ६ ) हे सुटे सरावपाठ म्हणून द्यावे लागतात. यापैकी ( ४+४) सरावपाठ आशययुक्त अध्यापन पद्दतीच्या प्रशिक्षण कार्यक्रमापूर्वी तर चार ( २ + २ ) सरावपाठ आशययुक्त अध्यापन पद्दतीच्या कार्यक्रमा नंतर द्यावे लागतात. प्रत्येक सरावपाठा नंतर प्रत्याभरणा-साठी कमीतकमी ५ मिनीटे वेळ दयावा लागतो.

सलग सरावपाठ कार्यक्रमा द्ये प्रशिक्षणार्थ्यांस उरलेले आठ सरावपाठ ( ४ + ४ ) हे सलग सरावपाठ म्हणून द्यावे लागतात. यासाठी २० प्रशिक्षणार्थ्यांचा एक गट या प्रमाणे ४ गट असतात. प्रत्येक गटात २ शिक्षक प्रशिक्षक असतात. सहकार्य देणाऱ्या ४ सरावपाठशाळा निवडून या शाळातून सलग २ आठवडे काम करावे लागते.

शालेय अनुभव कार्यक्रमामध्ये अभ्यासानुवर्ती उपक्रम योजने अंतर्गत वर्ग-शिक्षक म्हणून करावयाच्या कामाचा अनुभव घेणे, प्रयोग शाळेत प्रयोग होणे, छोटया विद्यार्थी गटास मार्गदर्शन करणे, वर्ग व्यवस्थापन करणे, विविध रजिस्टरे व नोंदपत्रके यांची माहिती घेणे. गुणपत्रके भरणे, निकाल तयार करणे इ. कामाचा समावेश होतो.

विविध पेपरमधील खालील प्रकारची प्रात्यक्षिके या शालेय अनुभव कार्यक्रमात पूर्ण करता येतात.

पेपर क्र.१ :- प्रात्यक्षिक १ व २

पेपर क्र.२ :- प्रात्यक्षिक अ, ब.क

पेपर क्र.३ :- प्रात्यक्षिक अ, ब. क, ग. इ. ज.

पेपर क्र.४ :- विभाग दुसरा

शैक्षणिक तंत्रविज्ञान : प्रात्यक्षिक ४
मार्गदर्शन व सल्लाकार्य : प्रात्यक्षिक २ व ३
आरोग्यशिक्षण व शा. शिक्षण : TT १, ४, ५
लोकसंख्या शिक्षण : प्रात्यक्षिक ७
शालेय ग्रंथालय सेवा : प्रात्यक्षिक २ व ४
मूल्यशिक्षण : प्रात्यक्षिक

पेपर ५ :- अध्यापन पद्धती :-

प्रत्येक अध्यापन पद्धतीची खालील प्रात्यक्षिके :

१) अभ्यासानुवर्ती उपक्रमाचे आयोजन

२) भित्तीपत्रक निर्मिती व प्रदर्शन

३) नैदानिक कसोटीसाठी सर्वेक्षण कसोटी

४) अनुषंगिक अन्य प्रात्यक्षिक

सलग सराव पाठ आणि शालेय अनुभव कार्यक्रम हे दोन्हीही कार्यक्रम एकाचवेळी द्यावे लागतात. त्यामुळे त्याचे योग्य व्यवस्थापन व नियोजन करावे लागते.

क) आशययुक्त अध्यापन पद्धती कृतीसत्र :-

आशययुक्त अध्यापन हा शिक्षक प्रशिक्षण क्षेत्रात नव्याने रूजत असलेला विचार आहे. आशय युक्त अध्यापन पद्धतीचे कृतीसत्र हे प्रत्येक विषय अध्यापन पद्धतीसाठी एक असे आयोजित करावे लागते. प्रत्येक कृतीसत्र १० दिवसाचे असते व त्यासाठी ५० तास देण्यात येतात. या कालावधीत अन्य व्याख्याने व सरावपाठ नसतात.

अभ्यासक्रमाचे विश्लेषण, विषयाचा आकृतीबंध आणि क्रमबद्धता, पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके यातील सहसंबंध शोधणे, त्रुटीचा शोध घेणे, एका पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण , विषयाची संरचना, विषयातील प्रमुख संबोध व तत्वे, भिन्न स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या कोणत्याही एका घटकाचे आशय विश्लेषण ८ वी ते १० वी पैकी कोणत्याही दोन सलग इयत्तातील कोणत्याही दोन घटकांचे आशय विश्लेषण , २ संबोधाचा प्रत्येकी तीन विभिन्न पाठ टाचणे इ. गोष्टींचा आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या कृतीसत्रातील प्रात्यक्षिक कार्यात समावेश होतो.

ड) मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम :-

हे प्रात्यक्षिक काम पेपर ५ शी निगडीत आहे. ज्या प्रशिक्षणार्थ्यांना या प्रात्यक्षिकाची निवड केली असेल. त्यांनाच हे प्रात्यक्षिक पूर्ण करावे लागते.

यामध्ये वार्षिक नियोजन, घटक नियोजन व घटक चाचणी तयार करावी लागते. तसेच नैदानिक कसोटी ही करणे आवश्यक आहे.

इ) अभ्यासानुवर्ती / अभ्यासपूरक / सांस्कृतिक कार्यक्रमाचे संघटन व सहभाग :-

या प्रात्यक्षिक कार्यामध्ये एका शैक्षणिक वर्षात होणारे सातत्याने विविध उपक्रम, प्रासंगिक उपक्रम, गटवार उपक्रम स्पर्धा, स्नेहसंमेलन इ. येते.

प्रासंगिक उपक्रमात विविध सन व उत्सव साजरे करणे, विविध दिन साजरे करणे, थोर व्यक्तींच्या जयंत्या व पुण्यतिथ्या साज-या करणे, परिसंवाद चर्चा, वादविवाद आयोजित करणे, तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे इ. गोष्टींचा समावेश होतो.

गटवार उपक्रमात प्रदर्शन, विविध मंडळांचे उपक्रम, विविध स्थळांना भेटी, सांस्कृतिक कार्यक्रम, भित्तिपत्रिका इ. गोष्टींचा समावेश होतो.

वार्षिक स्नेहसमेलनाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे लागतात.

ई) प्रपाठ / निबंध :-

मराठी अध्यापन पद्धती मध्ये १ प्रपाठ प्रशिक्षणार्थ्यांनि परीक्षा पद्धतीच्या वातावरणात पूर्ण करावयाचा असतो.

न) अंतर्गत परीक्षा :-

मराठी अध्यापन पद्धतीची पहिले सत्रा समाप्तीपूर्वी ६० गुणांची १ तासाची, झालेल्या घटकावर आधारीत अंतर्गत परीक्षा दयावी लागते.

प) प्रात्यक्षिक परीक्षा :-

मराठी अध्यापन पद्दती घेतलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना या प्रात्यक्षिक परीक्षे मध्ये दोन टप्प्यातून जावे लागते. पहिल्या टप्प्यात वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन केले जाते तर दुस-या टप्प्यात वार्षिक पाठ दयावा लागतो.

0 0 0

## २:८ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची उद्दिष्टे

वर विवेचन केल्या प्रमाणे मराठी अध्यापन पद्धतीच्यापाठ्यक्रमाचा संपूर्ण प्रात्यक्षिक भाग बी. एड. पदवी घेवू इच्छिणा-या प्रशिक्षणार्थ्यास पूर्ण करावा लागतो. हा प्रात्यक्षिक कार्याचा भाग पूर्ण करण्या पाठीमागे उद्दिष्टे असतात. ही उद्दिष्टे पुढील प्रमाणे क्रमवार सांगता येईल.

**सैद्धान्तिक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिक उद्दिष्टे :-**

१) मराठी अध्यापन पद्धतीच्या सैद्धान्तिक विषयांशी निगडीत प्रात्यक्षिक कामाची तात्विक माहिती मिळविण्यास मदत करणे.

२. मराठी अध्यापन पद्धतीच्या सैद्धान्तिक विषयांशी निगडीत प्रात्यक्षिक काम पूर्ण करण्यास मदत करणे.

**सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रम :-**

उद्दिष्टे :- १) प्रशिक्षणार्थ्यास महत्वाच्या सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता साध्य करण्यास मदत करणे.

२) विविध अध्यापन कौशल्याचे एकात्मिकरण करण्यास मदत करणे.

**सरावपाठ प्रशिक्षण व शालेय अनुभव कार्यक्रम :-**

उद्दिष्टे :- १) प्रशिक्षणार्थ्यास वर्ग अध्ययन कार्यासाठी अपेक्षित अशा अध्यापन पद्धती, तंत्रे व कलुपत्या याविषयी माहिती मिळविण्यास मदत करणे.

२) पाठ नियोजन तत्वानुसार विविध पाठांचे नियोजन करण्यास मदत करणे.

३) प्रशिक्षणार्थ्यास अध्यापनाचा सराव देऊन अध्यापन पद्धती आत्मसात करण्यास मदत करणे.

४] प्रशिक्षणार्थ्यास वास्तव परिस्थितीत अध्यापन कार्याची संधी देऊन त्याची परिणामकारकता अजमाविण्यास मदत करणे.

५] प्रशिक्षणार्थ्यास शाळेमध्ये कराव्या लागणाऱ्या अभ्यासपूरक कामाचा अनुभव देणे.

६] शालेय परिस्थितीत येणाऱ्या अडचणी आणि त्या सोडविण्याचे मार्ग याविषयीचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

** आशययुक्त अध्यापन पध्दती वृत्तिसत्र :-

उद्दिष्टे :-

१] प्रशिक्षणार्थ्यास विशेष अध्यापन पध्दतीसाठी घेतलेल्या विषयाच्या अभ्यासक्रमा विषयी व त्याच्या विश्लेषणा विषयी परिचित करणे.

२] प्रशिक्षणार्थ्यास पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंधाविषयी जागृत करणे.

३] प्रशिक्षणार्थ्यास पाठ्यपुस्तकातील आशयाचे विश्लेषण करण्याच्या पध्दती विषयी जागृत करणे व आशय विश्लेषण करण्यास प्रवृत्त करणे.

४] प्रशिक्षणार्थ्यास काही संबोधांच्या आधारे त्यांची वरच्या वर्गात झालेली पुनरावृत्ती, त्यांचे आंतर संबंध तत्वे व उत्पत्ती या रीतीने असलेले पध्दतशीर व्यवस्थापन लक्षात आणून देणे आणि ते शोधण्याच्याकामी प्रवृत्त करणे.

५] प्रशिक्षणार्थ्यास प्रत्येक वर्गाच्या भिन्न अध्ययन गरजाविषयी परिचित करणे, त्याचनुसार एक संबोध त्याच वर्गात तसेच भिन्न वर्गात शिकविताना विभिन्न अध्यापन पध्दतीची गरज असते हे जाणण्यास व त्याप्रमाणे वागण्यास मदत करणे.

६] आशय आणि अध्यापन पध्दती यांच सहेतुक एकात्मिकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षण व अध्यापन कौशल्ये विकसित करण्यास मदत करणे.

७] प्रशिक्षणार्थ्यास शालेय स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या संबोधाचे खोलवर आकलन करण्यास मदत करणे.

## -: मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रम :-

उद्दिष्टे :-

(१) प्रशिक्षणार्थ्यांस वार्षिक नियोजन, घटक नियोजन व पाठ नियोजन या विषय अध्यापन नियोजनशी निगडीत बाबी समजण्यास मदत करणे.

(२) प्रशिक्षणार्थ्यांस एका विषयाची वार्षिक नियोजन करण्यास मदत करणे.

(३) प्रशिक्षणार्थ्यांस एका घटकाचे घटक नियोजन करण्यास मदत करणे.

(४) प्रशिक्षणार्थ्यांस एका घटकाची घटक चाचणी तयार करण्यास मदत करणे.

(५) प्रशिक्षणार्थ्यांस एका घटकाची नैदानिक कसोटी तयार करण्यास मदत करणे.

(६) - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

## -: अभ्यासानुवर्ती / अभ्यासपूरक / सांस्कृतिक कार्यक्रमाचे संघटन व :- सहभाग

उद्दिष्टे :-

१) प्रशिक्षणार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा विकास होण्यास संधी मिळवून देणे.

२) प्रशिक्षणार्थ्यांत समायोजन, नियोजन बध्दता, सहकार्यवृत्ती, सभाधीटपणा सांघिक वृत्ती, जबाबदारीची जाणीव इ. गुणांचा परिपोष करणे.

३) प्रशिक्षणार्थ्यांच्या नेतृत्व गुणांचा विकास करणे,

४) प्रशिक्षणार्थ्यांस सौंदर्यदृष्टीची जोपासना करणे.

५) प्रशिक्षणार्थ्यांस विविध उपक्रमांचे व त्यांच्या आयोजन पध्दतीचे ज्ञान मिळविण्यास मदत करणे.

६) प्रशिक्षणार्थ्यांत उपक्रम आयोजन कौशल्य निर्माण करणे.

७) प्रशिक्षणार्थ्यांस काही उपक्रमात सहभागी होण्याचा अनुभव मिळवून देणे.

गृपाठ/ निबंध :

उद्दिष्टे :- १) प्रशिक्षणार्थ्यांस सतत अभ्यासाची सवय लावणे.

२) प्रशिक्षणार्थ्यांस वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने लेखनाची सवय लावणे.

३) प्रशिक्षणार्थ्यांनी शिकविलेल्या भागा पैकी किती आत्मसात केले, याचा शोध घेणे.

४) प्रशिक्षणार्थ्यांस स्वयंमूल्यमापनाची सवय लावणे.

**अंतर्गत परीक्षा :-**

**उद्दिष्टे :-** १) प्रशिक्षणार्थ्यांनी बी.एड्. अभ्यासक्रमातील सैद्धान्तिक विषयात प्राप्त केलेले प्राविण्य मोजणे.

२) प्रशिक्षणार्थ्यांस वार्षिक लेखी परीक्षेच्या दृष्टीने लेखनाची सवय लावणे.

३) प्रशिक्षणार्थ्यांतील विशेष प्राविण्य असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचा शोध घेणे.

**प्रात्यक्षिक परीक्षा :-**

**उद्दिष्टे :-**

१) प्रशिक्षणार्थ्यांनी केलेल्या प्रत्येक विषयातील व अनुषंगिक प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन करणे.

२) प्रशिक्षणार्थ्यांच्या अध्यापन क्षमतेचे सार्वत्रिक मूल्यमापन करणे.

३) प्रशिक्षणार्थ्यांची बी.एड. भाग - २ मधील गुणवत्ता ठरवून त्यास दर्जा देणे.

०००००० 

## २.९. मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची उध्दिष्टांची स्पष्टीकरणे

सैध्दान्तिक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिक काम उध्दिष्टांची स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे संपादन करतो.

१. कोणत्याही भाषिक कौशल्याच्या एका घटकावर निदानात्मक कसोटी तयार करतो.
२. प्रशिक्षणार्थी शाळेतील विद्यार्थ्यांच्या समवेत हस्तलिखित तयार करतो.
३. प्रशिक्षणार्थी शाळेत मातृभाषेच्या अध्यापनाला योग्य अशा एका अभ्यासानुवर्ती उपक्रमाचे आयोजन करतो.
४. मातृभाषेच्या संदर्भात कोणत्याही एका विषयावर भित्तीपत्रक तयार करुन लावतो.
५. मातृभाषेतील कोणत्याही एका घटकांचे घटक नियोजन करुन त्याची घटक चाचणी तयार करतो.

सूक्ष्म-अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमातुन तो पुढील कौशल्ये संपादन करतो.

१) प्रशिक्षणार्थी महत्वाच्या सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता साध्य करतो.
२) विविध अध्यापन कौशल्याचे एकात्मिकरण करतो.

सराव पाठ प्रशिक्षण व शालेय अनुभव कार्यक्रमातून तो पुढील वर्तन परिवर्तन करतो.

१) प्रशिक्षणार्थ्यांना विशिष्ठ वर्गासाठी कोणती अध्यापन पध्दती वापरावी याचे ज्ञान प्राप्त होते.
२) पाठ नियोजनाच्या तत्वांचा वापर करुन, विविध तंत्र, क्लृप्त्या वापरुन मराठीच्या पाठाचे नियोजन करतो.
३) प्रशिक्षणार्थी अध्यापनाचा सराव करुन भिन्न भिन्न अध्यापन पध्दती आत्मसात करतो.
४) प्रशिक्षणार्थी वास्तव परिस्थितीतील अध्यापन कार्याचे निरीक्षण करुन त्याची परिणामकारकता अजमावतो.
५) प्रशिक्षणार्थ्यांना शाळेमध्ये कराव्या लागणा-या अभ्यासपूरक कामांचा अनुभव मिळतो.
६) शालेय परिस्थितीत येणा-या अडचणी आणि त्या सोडवण्याचे मार्ग या विषयाचे ज्ञान मिळवितो.

आशययुक्त अध्यापन पद्दती कृतीसत्रामधून प्रशिक्षणार्थ्याला पुढील कौशल्ये प्राप्त होतात:

१. मराठी अध्यापन पद्दतीच्या अभ्यासक्रमातील घटक सांगतो व त्याचे विश्लेषण करतो.
३. पाठ्यपुस्तकातील कोणत्याही घटकाचे आशय विश्लेषण करतो.
४. संबोधाच्या आधारे त्यांची वरच्या वर्गात झालेली पुनरावृत्ती, त्यांचे आंतर संबंध, तत्वे, उत्पत्ती, सांगतो / शोधून काढतो.
५. प्रत्येक वर्गाच्या अध्ययनाच्या गरजा भिन्न भिन्न असतात. याचे आकलन करून घेतो. त्यानुसार एक संबोध त्याच वर्गात तसेच भिन्न वर्गात शिकविताना विभिन्न अध्यापन पद्दतीचा अवलंब करतो.
६. आशय आणि अध्यापन पद्दती यांचे सहेतुक एकात्मिकरण करतो. त्यानुसार निरीक्षण कौशल्ये विकसीत करतो.
७. शालेय स्तरावर शिकवील्या जाणाऱ्या संबोधांचे खोलवर आकलन करतो.

मूल्यमापन विशेष प्रशिक्षण कार्यक्रम :- यातुन प्राप्त होणारी कौशल्ये पुढील प्रमाणे सांगता येतील.

१) प्रशिक्षणार्थी वार्षिक नियोजन, घटक नियोजन, करतो.
२) एका विषयाचे वार्षिक नियोजन कसे करावयाचे ते समजावून घेतो.
३) एका घटकाचे घटक नियोजन करू शकतो.
४) एका विषयाचे वार्षिक नियोजन कसे करावयाचे ते समजावून घेतो.
५) एका घटकाची घटक चाचणी तयार करतो.
५) एका घटकाची नैदानिक कसोटी तयार करतो.

अभ्यासानुवर्ती / अभ्यासपुरक / सांस्कृतिक कार्यक्रम :- विषयाचे संघटन व सहभाग या प्रात्यक्षिक कार्यातून पुढील कौशल्ये हस्तगत करतो.

१. प्रशिक्षणार्थी स्वत:च्या सुप्त कलागुणांचा विकास करून घेण्याची संधी मिळवतो.
२. स्वत: मध्ये समायोजन, नियोजन क्षमता, सहकार्य करण्याची वृत्ती, समयसूचकता, सांघिक वृत्ती, जबाबदारीची जाणीव इ. गुणांचा विचार करतो.

३) प्रशिक्षणार्थी नेतृत्वाचे गुण विकसीत करतो.
४) प्रशिक्षणार्थ्यात सौंदर्यदृष्टी जोपासली जाते.
५) प्रशिक्षणार्थ्यास विशेष उपक्रमांचे व त्याच्या आयोजन पद्दतीचे ज्ञान प्राप्त होते.
६) प्रशिक्षणार्थी काही उपक्रमात हिरीरीने भाग घेतो.

प्रपाठ / निबंध लिहिण्या मधून प्रशिक्षणार्थींची अभिवृत्ती पुढील प्रमाणे बदलते.

१) प्रशिक्षणार्थ्याला अभ्यासाची सवय लागते.
२) प्रशिक्षणार्थी वार्षिक परीक्षेच्या दृष्टीने लेखन करतो.
३) प्रशिक्षणार्थी शिकविलेल्या भागाचा परिपूर्ण अभ्यास करून किती आत्मसात केले आहे. त्याचा शोध होतो.
४) प्रशिक्षणार्थ्यास स्वयंमूल्यामापनाची सवय लागते.

अंतर्गत परीक्षा दिल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यात पुढील वर्तन परिवर्तन जाणवते.

१) प्रशिक्षणार्थी बी. एड. अभ्यासक्रमातील सैद्दांत्तिक विषयातील प्राप्त केलेले प्राविण्य बोजतो.
२) प्रशिक्षणार्थ्यार्थी वार्षिक लेखी परीक्षेच्या दृष्टीने कराव्या लागणा-या लेखनाची सवय लावून घेतो.
३) प्रशिक्षणार्थी विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या प्रशिक्षणार्थ्याचा शोध घेतो.

प्रात्यक्षिक परीक्षा दिल्यामुळे उद्दिष्टांची स्पष्टीकरणे पुढील प्रमाणे प्राप्त करता येतात.

१) प्रशिक्षणार्थींला मराठी अध्यापन पद्दतीच्यापाठ्यक्रमातील व अनुषंगिक प्रात्यक्षिक कार्यातील मूल्यमापन करता येते.
२) प्रशिक्षणार्थ्याला बी. एड्. भाग - २ मधील गुणवत्ता ठरवून दर्जा देता येतो.
३) प्रशिक्षणार्थ्याला बी. एड्. भाग - २ मधील गुणवत्ता ठरवून दर्जा देता येतो.

वरील प्रमाणे मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमातील प्रत्येक प्रात्यक्षिक कार्यपाठीभागील उद्दिष्टांची स्पष्टीकरणे प्रशिक्षणार्थ्यांना आत्मसात करून वर्तनातील परिवर्तन साध्य करता येते.

0 0 0 00

## २·१०· मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक भागाची कार्यवाही

सैद्धान्तिक विषयाशी निगडीत प्रात्यक्षिक काम या भागाची कार्यवाही पुढील प्रकारे केली जाते· मराठी अध्यापन पद्धतीसाठी ४ - ५ प्रात्यक्षिक दिली असून त्यापैकी प्रत्येकी एक प्रात्यक्षिक करवून घेतले जाते· शिक्षक प्रशिक्षकाकडून आपल्या विषयातील प्रात्यक्षिकांची माहिती विद्यार्थी शिक्षकांना आपल्या विषय अध्यापनात दिली जाते· या प्रात्यक्षिकापैकी घटक नियोजन व घटक चाचणी, नैदानिक कसोटी रचना ही दोन प्रात्यक्षिके मूल्यमापन प्रशिक्षण कार्यक्रमात पूर्ण करुन घेतली जातात· अभ्यासानुवर्ती उपक्रमाचे आयोजन भित्तीपत्रक निर्मिती ही दोन प्रात्यक्षिके शालेय अनुभव कार्यक्रमाच्यावेळी पूर्ण करवून घेतली जातात· इतर प्रात्यक्षिकासाठी मात्र स्वतंत्र वेळ दयावा लागतो· याचा हेतू :- प्रशिक्षणार्थ्याला तात्त्विक माहिती मिळावी हा आहे· तसेच या प्रात्यक्षीकाची पूर्तता करण्यासाठी दिवाळीची सुट्टी किंवा फेब्रुवारीचा पहिला आठवडा हा सर्वाधिक योग्य कालखंड आहे· कारण तोपर्यन्त त्या त्या विषयाच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिकाशी संबंधित असलेले घटक शिकवून पूर्ण झालेले असतात· प्रत्येक प्रात्यक्षिक कार्याचा पूर्वावश्यक तात्त्विक भाग हा विभिन्न असतो· प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला प्रात्यक्षिके विभागून इच्छेनुसार दिली जातात· शिक्षक प्रशिक्षकांच्या प्रात्यक्षिकाच्या स्वरुपा नुसार गटवार मार्गदर्शन केले जाते· आणि मूल्यमापनासाठी वस्तुनिष्ठ पद्धती वापरली जाते· हे मराठी अध्यापन पद्धतीचे प्रात्यक्षिक पूर्ण करण्यासाठी ५ तास इतका वेळ लागतो आणि यासाठी १० गुणांची योजना असते·

### : सूक्ष्माध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमाची कार्यवाही :

सूक्ष्म अध्यापन प्रशिक्षण कार्यक्रमाची रुपरेषा पुढीलप्रमाणे असते·

१) सर्वसाधारण पूर्वावश्यक तात्त्विक भागाची २/३ व्याख्याने होतात·

२) सूक्ष्म अध्यापनाची जी पाच कौशल्ये निवडली जातात त्यांची तात्त्विक माहिती, त्या त्या कौशल्यांचे घटक, कौशल्यांची निरीक्षण पद्धती व पाठनियोजन याबर व्याख्याने होतात· एका कौशल्याच्या प्रशिक्षणाचे सराव - चक्र पूर्ण झाल्यावरच दुस-या कौशल्यांचे व्याख्यान दिले जाते·

३) प्रत्येक कौशल्याचा तात्त्विक भाग सांगून झाल्यावर शिक्षक प्रशिक्षक त्या कौशल्याचा नमुना पाठ सादर केला जातो. तो पांच मिनीटाचा असतो. शक्य झाल्यास शिक्षक - प्रशिक्षक प्री - रेकॉर्ड , व्हीडीओ, पाठ दाखवितात आणि पाठाच्या गुण - दोषांची चर्चा केली जाते.

४) पाठ नियोजनासाठी कौशल्यानुरुप निवडावयाच्या घटकाची वैशिष्ठे व नियोजनाची तत्वे यावर व्याख्यान दिले जाते.

त्यानंतर प्रशिक्षणार्थ्यांना पाठाची टाचणे काढावयास सांगितली जातात. निर्दोष व अचूक सूक्ष्मपाठ नियोजन निर्दोष अध्यापनाची पूर्वावश्यक गोष्ट आहे. सूक्ष्म अध्यापन हे आशयाविना असते. तसेच उद्दिष्टांनाही यामध्ये महत्व नसते. सूक्ष्मपाठ नियोजनात शिक्षककृती विद्यार्थी कृती व कौशल्य घटक असे तीनच स्तंभवण फारच महत्वाचे असतात. त्यावरुन एकूण कौशल्या अंतर्गत किती घटक आहे ? आणि ते घटक कोणते ? याचा स्पष्ट उलगडा होतो. अर्ध्या अर्ध्या मिनीटांचे १० स्तंभ नियोजनात असतात. प्रत्यक्ष अध्यापनात त्या त्या कौशल्याचे उपघटक जास्तीत जास्त प्रमाणात यावे लागतात. तेंव्हा ते कौशल्य आत्मसात करता येते.

५) सूक्ष्मपाठांचे आयोजन करताना कमीत कमी दहा प्रशिक्षणार्थ्यांचा एक गट असतो. या एका गटामध्ये पाठ निरिक्षक प्राध्यापक, दोन प्रशिक्षणार्थी पाठ निरीक्षक एक वेळ पहाणारा निरीक्षक, आणि पांच प्रशिक्षणार्थी ऐक वेळ पहाणारा निरीक्षक,आणि पांच प्रशिक्षणार्थी बसलेले आणि पाठ घेणारे एक प्रशिक्षणार्थी असे एकूण १० प्रशिक्षणार्थी आवश्यक असतात. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास पांच मिनीटाचा सूक्ष्मपाठ द्यावा लागतो. जो प्रशिक्षणार्थी पुढील पाठ घेणारा असतो. त्याला मननासाठी वेळ दिला जातो. पाठापूर्वी त्याला कोणतेच इतर काम लावले जात नाही. निरीक्षण कार्यासाठी निरीक्षण नोंद तक्ता असतो. शक्य असल्यास टेपरेकार्डर व व्हिडीओ कॅमेरा वापरला जातोच . शक्य असल्यास टेपरेकार्डर व व्हिडीओ कॅमेरा वापरला जातो. प्रशिक्षणार्थी आपले काम गंभीरपणे करतो. शिक्षक प्रशिक्षक पाठ नियोजना नुसार पाठ झाला का हे पाहून लक्षणीय चुकांच्या नोंदी ठेवतात. सर्व प्रशिक्षणार्थ्यांना निरीक्षकापेक्षा सराव शिक्षकाची व विद्यार्थ्यांची भूमिका मिळेल असे गटाचे नियोजन केलेले असते.

६) प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याच्या सूक्ष्म पाठानंतर लगेच प्रत्याभरण केले जाते. प्रशिक्षणार्थ्यांची मते निरीक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या नोंदी विचारात घेतल्या जातात. सूक्ष्म पाठाचे अध्यापन करताना येणाऱ्या घटकांचा विचार केला जातो. अपेक्षित संख्येपेक्षा कमी घटक झाले तर पुन्हा मार्गदर्शन केले जाते. त्याच्य घटक केव्हा व कसे घडले हे निदर्शनाला आणावे लागते व ते टाळण्यासाठी उपायसांगितले जातात. ज्या कौशल्यावर पाठ चालू आहे. त्याच कौशल्याची चर्चा करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. अन्य कौशल्याच्या गुणदोषांची चर्चा टाळली जाते.

७) पुनरनियोजना मध्ये प्रशिक्षणार्थ्यास आपण नेमके कोणते बदल करणार आहेत हे पुन्हा सर्व गटास सांगावे लागते. त्यानंतर त्यांना पुनरनियोजनासाठी पुरेसा वेळ दिला जातो. शिक्षक प्रशिक्षकाकडून ही पाठटाचणे तपासून योग्य ते मार्गदर्शन केले जाते. असे काम सर्व गटाचे शक्यतो एका वेळेस चालू असते.

८) पुनरनियोजित पाठाचे पुनरअध्यापन दुसऱ्या गटात होते. अध्यापन सत्रा प्रमाणेच निरीक्षणाची योजना असते. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यास त्या त्या कौशल्य संपादनातील अपेक्षित पातळी प्राप्त होईपर्यंत प्रत्याभरण पुनरनियोजन - पुनरअध्यापन असे चक्र चालू रहाते.

९) एका कौशल्यासाठी वेळेचे नियोजन साधारणपणे पुढील प्रमाणे असते.

| | |
|---|---|
| तात्त्विक माहिती - नमुना पाठ व चर्चा | - २ तासिका |
| पाठनियोजन व पाठघटक माहिती व चर्चा | - १ तासिका |
| पाठनियोजन | २ -"- |
| अध्यापनसत्र व चर्चा | ४ -"- |
| पुनरनियोजन | २ -"- |
| पुनरअध्यापन सत्र व चर्चा | ३ -"- |
| एकूण | १४ तासिका |

अशा प्रकारे ५ कौशल्यांच्या एका सराव प्रक्रासाठी अंदाजे ६० तास म्हणजे अंदाजे १० दिवस लागतात. तसेच सूक्ष्म अध्यापनाची प्रारंभिक माहिती सांगण्यासाठी साधारण १ तासिका एवढा वेळ दिला जातो.

१०) शेवटी एकात्मिकरण पाठाची तात्त्विक माहिती नमुना पाठ व चर्चा, पाठनियोजन व घटक निवडीची तत्त्वे याबर २ व्याख्याने दिली जातात यासाठी ९ तास लागतात.

११) एकात्मिकरणाचा एक पाठ १५ ते २० मिनिटांचा असतो. प्रशिक्षणार्थ्यांना त्याचे मार्गदर्शन दिले जाते.

१२) एकात्मिकरणाचा पाठ सुरू करण्यापूर्वी पाठ नियोजन तपासून घ्यावे जाते. अपेक्षित ती सर्व कौशल्ये व त्याचे घटक पाठ नियोजनात येणे आवश्यक असते. प्रत्याभरणासह एका एकात्मिकरणा पाठाचे अध्यापनाचे काम अंदाजे १० तासात पूर्ण होते.

हेतू :- प्रशिक्षणार्थ्यांस अध्यापनाच्या कौशल्य क्षमता प्राप्त करता याव्यात. तसेच विविध अध्यापन कौशल्याचे एकात्मिकरण करता यावे. हा आहे.

याकाठीचा योग्य कालखंड शिक्षणशास्त्र महाविद्यालये सुरु होताच प्रारंभीचे १५ दिवस हा असतो. यासाठी २० गुण असतात.

## सराव पाठ प्रशिक्षण व शालेय अनुभव कार्यक्रमाची कार्यवाही:-

सूक्ष्म अध्यापनाच्या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर सराव पाठासाठी तात्त्विक प्रशिक्षणाचे काम सुरु होते. यात संबंधित व्याख्याने दिली जातात. तात्त्विक माहिती देऊन झाल्यावर प्रत्येक विषयाचा किमान एक दिग्दर्शित नमुना पाठ आयोजित केला जातो. त्यावर चर्चा केली जाते. या कार्यक्रमास अंदाजे १८तास लागतात. दिग्दर्शित नमुना पाठाचे टाचण पाठापूर्वी किमान एक दिवस आधी काचपेटीत लावले जाते व प्रशिक्षणार्थ्यांना ते लिहून घेण्यास सांगितले जाते. दरम्यानच्या काळात प्रशिक्षणार्थ्यांच्या सरावपाठाचे वेळापत्रक लावले जाते. सुरुवातीच्या आठवड्यात अनुभवी प्रशिक्षणार्थींचे पाठ घेतात. प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन देण्यासाठी दिग्दर्शित पाठानंतर २/१ दिवस वेळ दिला जातो.

सुटे सरावपाठ कार्यक्रमाची कार्यवाही :-

सुटे सरावपाठ वेगवेगळ्या सरावपाठ शाळेत वेगवेगळ्या वर्गावर तसेच वेगवेगळ्या मार्गदर्शकाच्या हाताखाली पूर्ण केले जातात. शिक्षक प्रशिक्षक या पाठांचे पूर्ण वेळ निरीक्षण करतात. ज्या शिक्षक प्रशिक्षक नी मार्गदर्शन केले त्यानीच तो पाठ निरीक्षणासाठी घ्यावयाचा असतो. मार्गदर्शना अभावी पाठ होत नाही. पाठापूर्वी पक्के टाचण तयार असावे लागते. पाठनिरीक्षण वस्तुनिष्ठकेले जाते. शेरे वर्णनात्मक उपचारात्मक असतात. प्रत्येक पाठाचे मूल्यमापन करण्यास पद निश्चयन श्रेणी वापरली जाते. प्रत्याभरण केले जाते. दुसऱ्या दिवशी किंवा लगेच प्रत्याभरण पाठ घेतला जातो. पाठ निरीक्षणासाठी वापरलेला नोंद तक्ता असतो तो प्रत्येक पाठ . टाचणाच्या शेवटी छापलेला असतो.

| अ.नं. | उल्लेखनीय बाबी | कमतरता/टाळण्याच्या बाबी | उपचारात्मक सूचना |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| ४ | | | |
| ५ | | | |

सराव पाठाच्या मूल्यमापनाचे पदनिश्चयन श्रेणी

| अ.नं. | घटक | इ | ड | क | ब | अ |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पाठ टाचण लेखन | | | | | |
| २) | आशयाचे संघटन | | | | | |
| ३) | वातावरण निर्मिती | | | | | |
| ४) | पाठ हेतु निवेदन | | | | | |
| ५) | स्पष्टीकरण क्षमता | | | | | |
| ६) | प्रश्न पद्दती क्षमता | | | | | |
| ७) | फलक कार्य | | | | | |
| ८) | चेतक विविधता | | | | | |
| ९) | आशय प्रभुत्व | | | | | |
| १०) | वर्ग व्यवस्थापन | | | | | |
| ११) | अध्ययन अनुभवांची विविधता | | | | | |
| १२) | समारोप | | | | | |
| १३) | स्वाध्याय | | | | | |
| १४) | मूल्यमापन साधनांचा अवलंब | | | | | |
| १५) | मूल्यमापनातील विद्यार्थी प्रतिसाद | | | | | |
| १६) | नियोजनबद्द कार्यवाही | | | | | |
| १७) | वर्ग वातावरण | | | | | |
| १८) | संकलित प्रभाव | | | | | |

("अ" बिंदू त्या मुद्याची परिपूर्णता तर "इ" बिंदू अभाव दाखवितो)

सलग सराव पाठाच्या कार्यक्रमाची कार्यवाही :-

हे चालू होण्यापूर्वी आशय युक्त अध्यापन पध्दतीचे कृतीसत्र, मूल्यमापन कृतीसत्र, तसेच शालेय अनुभवाशी निगडीत प्रत्येक पेपरमधील प्रात्यक्षिक कामाविषयी तात्त्विक माहिती आणि अभ्यासेत्तर उपक्रमाची माहिती पाविण्याचे काम पूर्ण झालेले असते.

सलग सराव पाठासाठी मराठी अध्यापन पध्दतीचे उरलेले ४ सरावपाठ द्यावे लागतात. शेकडो २० प्रशिक्षणार्थींचा एक या प्रमाणे ४ गट केलेले असतात. प्रत्येक गटात मराठी अध्यापन पध्दती घेतलेली प्रशिक्षणार्थी असतात तसेच दोन शिक्षक प्रशिक्षकही असतात. सहकार्य देणा-या चार सराव पाठशाळा निवडून या शाळातुन सलग २ आठवडे काम होते. एखादी शाळा सलग २ आठवड्यासाठी मिळाली नाही तर दुस-या आठवड्यासाठी दुसरी शाळा घेतली जाते.

प्रशिक्षणार्थींना मराठी अध्यापन पध्दतीच्या चारही तासिका एकाच वर्गावर द्याव्या लागतात. त्यासाठी पुरेल एवढा घटक अध्यापनासाठी निवडला जातो. प्रशिक्षणार्थीला पहिल्या पाठात सविस्तर प्रस्तावना व शेवटच्या पाठात सविस्तर समारोप व मूल्यमापन लिहावे लागते चौथ्या पाठाला २० मिनीटे समारोप करून घटक चाचणी तपासून देऊन चर्चा केली जाते. याप्रमाणे एका अध्यापन पध्दतीची चारही पाठटाचणे त्यांनी एकत्रितरित्या काढावयाची असतात. शिक्षक प्रशिक्षका शिवाय शालेय शिक्षकांची ही मदत निरीक्षणासाठी घेतली जाते. या सलग सरावपाठाचे संघटन व व्यवस्थापन करण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांपैकी मुख्याध्यापक उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांची योजना असते. हे काम १२ दिवसांचे असून यासाठी योग्य कालखंड फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यन्त असतो. यासाठी ४० गुण असून + प्रत्येक विषयाच्या प्रात्यक्षिकानुसार वेगळे गुण असतात.

शालेय अनुभव कार्यक्रमाची कार्यवाही :-

हा कार्यक्रम सलग सराव पाठाबरोबरच राबविला जातो. याचा हेतु

अध्यापनाव्यतिरिक्त शाळेत चालणा-या अन्य कार्यक्रमाचा प्रशिक्षणार्थ्यांस अनुभव मिळावा हा आहे. आपण कोणकोणती प्रात्यक्षिके पूर्ण करणार आहोत याचा विचार करून त्याप्रमाणे नियोजन केले जाते. शालेय अनुभव कार्यक्रमाचा आणखी एक हेतू म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांना शाळेतील चांगल्या शिक्षकांच्या पाठांचे निरीक्षण करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा आहे.

निरीक्षण नोंद तक्त्यांचा अवलंब करून सराव पाठांचे मुल्यमापन केले जाते. आरंभीच्या २ पाठांना गुण नसतात. उरलेल्या आठ पाठांना प्रत्येकी १०० प्रमाणे गुण दिले जातात. गुण देताना निरीक्षण नोंदीतील घटकांना दिलेल्या पदनिश्चयनाचा उपयोग केला जातो. ८०० पैकी प्राप्त गुण विचारात घेऊन ४० पैकी गुण काढतात. या कार्यक्रमासाठी कालावधीचे नियोजन पुढीलप्रमाणे असते.

प्रारंभिक तात्त्विक प्रशिक्षण व दिग्दर्शित पाठ - ४८ तास सुटे सराव पाठ कार्यक्रम - १२० तास.

सलग सरावपाठ व शालेय अनुभव कार्यक्रम - ३६ तास वरीलप्रमाणे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील सराव पाठ प्रशिक्षण व शालेय अनुभव कार्यक्रमाची प्रात्यक्षिक कार्यवाही करण्यात येते.

आशययुक्त अध्यापन पध्दती कृतीसत्राची कार्यवाही :-

मराठी अध्यापन पध्दतीसाठी हे एकच कृतीसत्र असते. प्रत्येक कृतीसत्र १० दिवसांचे आणि ५० तासांचे असते. कृतीसत्रातील सुरवातीची सर्वसामान्य व्याख्याने एकत्रीत दिली जातात आणि विषयवार विशिष्ठ व्याख्याने गटात दिली जातात. जितके विषय तितके गट असतात. प्रत्येक विषयाचे निम्मे विद्यार्थी एका गटात असतात. ज्या विषयाचे काम प्रथम सत्रात पूर्ण केले असेल तो विषय सोडून दुस-या विषयाचे काम दुस-या सत्रात पूर्ण करावे लागते. दुसरे सत्रात व्याख्याने नसतात.

कृतीसत्राचे आयोजन खालील प्रमाणे होते.

१) पहिला दिवस :- कृतीसत्राची कार्यपध्दती, आशययुक्त अध्यापनाचा अर्थ व महत्व, आशय विश्लेषण, पाठनियोजन यावर १ व्याख्याने होतात नंतर गटात वर्गीकरण होते. गटामध्ये शिक्षक प्रशिक्षकांकडून मराठी अध्यापन पध्दतीमधील तिस-या घटकाचे उजळणी स्वरुपाचे व्याख्यान होते.

२) दुसरा दिवस :- मराठी अध्यापन पध्दतीचा आकृतीबंध, आणि क्रमबध्दता याची शिक्षक प्रशिक्षकाकडून चर्चा होते. मराठी अध्यापन पध्दतीमधील प्रमुख अंगे, संबोध, सामान्यीकरणे, विषयाची वर्गवार व्याप्ती, सखोलता यांचे सोदाहरण दिग्दर्शक होते. पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके यातील सहसंबंध शोधला जातो. त्रुटींचा शोध लागतो. यासाठी शिक्षक प्रशिक्षकास १ चर्चासत्र व २ व्याख्याने द्यावी लागतात. नंतर हे काम प्रशिक्षणार्थी ८ वी ते १० वी पैकी कोणत्याही २ सलग इयत्तामधील मराठी विषयातील संबोध व सामान्यीकरणे यांचा शोध घेऊन त्यातील अंतरसंबंध शोधतात. यामध्ये शिक्षक प्रशिक्षक मदत करतात.

३) तिसरा दिवस :- शिक्षक प्रशिक्षक आशय विश्लेषणाची सोदाहरण चर्चा करतात. प्रशिक्षणार्थी मराठी अध्यापन पध्दती मधील विविध अंगाचे अध्यापन या घटकाच्या आधारे व अन्य संबोधांच्या आधारे दोन सलग इयत्तामधील संबोधांचे आशयविश्लेषण करतात.

४) चौथा दिवस/पाचवा दिवस व सहावा दिवस :- यामध्ये पाठनियोजन करावे लागते. एकच संबोध विविध अध्यापन पध्दती वापरुन शिकवावा लागतो. तेंव्हा पाठाची टाचणे विभिन्न काढावी लागतात व त्यांचे स्पष्टीकरण द्यावे लागते. ही पाठटाचणे आपल्या गटात वितरीत करावी लागतात. या पध्दतीने तीन दिवसात २ संबोधाची ३ विभिन्न पाठटाचणे काढावी लागतात.

५) सातवा, आठवा, नववा दिवस :- यामध्ये विभीन्न पध्दतीने काढलेल्या

पाठटाचणांचे अध्यापन करावे लागते. वेळापत्रकानुसार १0 विद्यार्थ्यांचे तीन दिवसात १0 पाठ होतात. प्रत्येकाने या पाठांचे निरीक्षण करावयाचे असते. प्रत्येक पाठ २५ ते ३५ मिनीटाऐवजी १५ ते २0 मिनिटांचा घेता येतो. प्रत्याभरण करुन शैक्षणिक साहित्य तयार करुन ते उपयोगात आणावयाचे असते.

६) दहावा दिवस :- आशययुक्त अध्यापन पध्दतीची आकलनाची चाचणी, विषय ज्ञानाची चाचणी घेतली जाते. चाचणीमध्ये पहिला प्रश्न निबंधवजा असतो दुसरा प्रश्न थोडक्यात उत्तरे व तिसरा प्रश्न बहुपर्यायी असतो. ७५% प्रश्न, पाठावर व २५% प्रश्न, शिक्षक प्रशिक्षकांच्या इच्छेनुसार असतात. यासाठी २ तास व ५0 गुण असतात.

मूल्यमापनावर विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाची कार्यवाही :-

हे प्रात्यक्षिक कार्य ज्या प्रशिक्षणार्थ्यांना निवडले असेल त्यांनाच या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमात समाविष्ट केले जाते. वार्षिक नियोजन, घटकनियोजन व घटक चाचणी यावर प्राध्यापकांच्याकडून व्याख्याने दिली जातात. नमुने दाखविले जातात. प्रशिक्षणार्थ्यांना त्यानुसार काम करावे लागते.

अभ्यासानुवर्ती/अभ्यासपूरक/सांस्कृतिक कार्यक्रमाचे संघटन व सहभाग यांची कार्यवाही :-

या प्रात्यक्षिकाचे काम सातत्याने होणा-या उपक्रम, प्रासंगिक उपक्रम, गटवार उपक्रम स्पर्धा, स्नेहसंमेलन अशा पातळीवर आयोजित केले जाते.

कुलपध्दतीचा अवलंब करुन १0 प्रशिक्षणार्थींचा एक गट असे बार गट तयार केले जातात. प्रत्येक गटात गटप्रमुख, उपगटप्रमुख, कार्यवाह असतो. प्रत्येक गटास एक स्वतंत्र मार्गदर्शक प्राध्यापक असतो, आणि बारही गटाचे संयोजन करणारा एक कार्याध्यक्ष असतो. सातत्याने करावयाच्या उपक्रमांची विभागणी सर्व गटात केली जाते. त्यामध्ये प्रार्थना, सुविचार लेखन, बातमीपत्र, भिंत्तीपत्रिका, हस्तलिखित गटाचे मासिक गीत इ. गोष्टींचा समावेश केला जातो.

-: प्रपाठ/निबंध कार्यवाही :-

मराठी अध्यापन पध्दतासाठी १ निबंध लिहावा लागतो. यासाठी तो घटक शिकविलेला असावा लागतो. त्यावर किमान तीन प्रश्न दिलेले असतात त्या प्रश्नांचे स्वरूप वार्षिक प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांप्रमाणे असते या तीन प्रश्नांची अपेक्षित उत्तरांची वर्गात चर्चा होते. घरी त्यांचा सराव केला जातो व उत्तरपत्रिका तपासून घेतली जाते व ऐनवेळी वर्गात कोणताही एक प्रश्न परीक्षेच्या वातावरणात लिहावयास सांगितला जातो.

-: अंतर्गत परीक्षा :-

कार्यवाही प्रथम सत्राच्या अखेरीस घेतली जाते.

: प्रात्यक्षिक परीक्षा कार्यवाही :

दोन टप्प्यात होते. पहिल्या टप्प्यात त्यांनी वर्षभर केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन होते तर दुसऱ्या टप्प्यात वार्षिक पाठ द्यावा लागतो.

२.११ -=: समारोप :=-

या प्रकरणामध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमामधील सैध्दान्तिक भाग व प्रात्यक्षिक कार्य यांचे विवेचन केलेले आहे.